
म.ग्रं.सं. वाचना...
विषय : ....वा...
दा. क्र. : ३५...

# बारा भाऊ आणि एक बहीण

राजा मंगळवेढेकर



३५४८

BVBK-0403548

# बारा भाऊ एक बहीण

क्र. ३५४८ दिनांक २६।४।८८
विषय बा०वा

BVBK-0403548

राजा मंगळवेढेकर

मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि.
२५१ क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि.

**बारा भाऊ एक बहीण**
**BARA BHAU EK BAHIN**

**प्रकाशिका :**
**सौ. मधुमिता राजीव बर्वे**
मॅनेजिंग डायरेक्टर,
मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि.
२५१ क, शनिवार पेठ,
पुणे - ४११ ०३०

**© राजा मंगळवेढेकर**
९, अशोकबन, मॉडेल कॉलनी,
पुणे - ४११०१६

**द्वितीय आवृत्ती :**
१५ फेब्रुवारी १९९९

**प्रकाशन क्रमांक : ८५३**

**ISBN - 81 - 7492 - 097 - 8**

**मुद्रक :**
**किरण दोशी**
अनमोल मुद्रणालय
४, सोमवार पेठ, कमला नेहरू हॉस्पिटलजवळ,
पुणे - ४११ ०११

**टाईपसेटिंग :**
**पितृछाया मुद्रणालय**
९०९ रविवार पेठ,
पुणे ४११ ००२

**मुखपृष्ठ व आतील चित्रे :**
दीपक संकपाळ

**मूल्य :**
रुपये पस्तीस मात्र

गोष्टीला माणूस आधी भेटला की,
माणसाला गोष्ट आधी भेटली,
हे मला निश्चित ठाऊक नाही.
पण माणूस असतो तिथं गोष्ट असते.
हे मात्र मला पक्कं ठाऊक आहे.
माणूस हा गोष्टीवेल्हाळ प्राणी आहे.
मुलं तर गोष्टीसाठी सदैव आतुर असतात.
म्हणूनच 'एकदा काय झालं...' असं
कानावर यायचाच अवकाश
'काय झालं?' हे ऐकण्यासाठी त्यांचे
कान लागलीच टवकारतात.
गोष्टीच्या रंगात ती एवढी रंगतात,
की पुष्कळदा ती तहान-भूकही विसरतात.
गोष्टीत हरवून जातात. तन्मय होतात.
गोष्टी ऐकण्या-वाचण्याचे वेड असणाऱ्या
बालगोपाळांसाठीच ह्या 'सांगीवांगीच्या गोष्टी.'
लोककथा, परिकथा, प्राणीकथा, देश, धर्म,
देव, संत, नेते, पुराण, इतिहास, साहस, शौर्य,
अद्‌भुत्‌ विनोद, चातुर्य... अशा विविध तऱ्हेच्या नि विविध
ठिकाणच्या या गोष्टी...
बालमित्रांना या खूप खूप आवडतील अशी आशा आहे.

राजा मंगळवेढेकर

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | ललाटरेखा | ५ |
| २. | चतुर अहमद | १२ |
| ३. | भुताला भेटला गुरू | १७ |
| ४. | लालजी आणि प्रेमजी | २२ |
| ५. | चोरांची फजिती | २८ |
| ६. | वीरसिंह राजाची चतुर राणी | ३३ |
| ७. | बारा भाऊ, एक बहीण | ४७ |
| ८. | शेरसिंहाचे चातुर्य | ५५ |

म. ग्रं. सं. ठाणें, बाळकोलकर शाखा.
बाल वाङ्मय विभाग
बा. क्र. ३५४८ दिनांक २६।३।९९
विषय बा०वा क्र.........

## १

# ललाटरेखा

कहाणी आहे जुनी-पुराणी. लक्ष देऊन ऐकण्यावाचण्यावाणी. आपण ऐकावी, वाचावी, दुसऱ्याला सांगावी.

तर एक आटपाट नगर होते. तिथे एक ब्राह्मण रहात होता. ब्राह्मण विद्वान होता. शहाणा होता त्याला किती तरी विद्या अवगत होत्या. शास्त्रग्रंथ पाठ होते. पण ब्राह्मण होता गरीब, निर्धन. तो विद्येलाच धन मानायचा. ज्ञानालाच वैभव समजायचा. पण ब्राह्मणीला हे रुचायचे नाही. पटायचे नाही. ती स्वभावाने खाष्ट होती. दुष्ट होती. ब्राह्मणावर रुष्ट व्हावयाची. ताडताड बोलाची. आदळआपट करायची.

ब्राह्मणाचा प्रपंच असा गरिबीचा. तशात त्यानं दोन शिष्य घरात आणून ठेवलेले! शिष्यांना ब्राह्मण वेदविद्या शिकवायचा, ज्ञान द्यायचा. पण जेवणाची वेळ झाली म्हणजे घरातून खडखडाट ऐकू यायचा. ब्राह्मणी तरी काय शिजवणार, काय वाढणार? घरात कधी कधी काहीच नसायचे.

मग शिष्यवर उठायचे. गावांत भिक्षा मागायला जायचे. कधी कधी पाणी पिऊनच झोपायचे.

दिवस असे चालले होते. ऋतुचक्र फिरत होते.


तर होता होता ब्राह्मणाला आणखीन एक चिंता उत्पन्न झाली. ब्राह्मणाची झोप उडाली. जिथं नवरा-बायकोचे पोट भरायची मारामार तिथं आणखी एक तिसरं तोंड येणार होतं. ब्राह्मणीला मूल होणार होतं.

ब्राह्मणीदेखील काळजीत पडली. ती नवऱ्याला म्हणाली, 'काही तरी करा. कुठं तरी जा. पोटापुरतं मिळवून या.' पण ब्राह्मणाला विचार कर-करूनही कुठं जावं, काय करावं, पोटासाठी कसं मिळवावं ह्याचं कोडं काही सुटलं नाही. ब्राह्मणी चिडली, संतापली. नवऱ्याला बोलबोल बोलली. ब्राह्मण वैतागला, कंटाळला. रात्रीच्या अंधारात घर सोडून निघून गेला.

सकाळी हे ब्राह्मणीला कळलं तेव्हा तिला ब्रह्मांड आठवलं. ती रडली, भेकली, पस्तावली. तिनं स्वत:ला दूषणं लावली. आपल्या नशिबाला नावं ठेवली.

ब्राह्मणीचं रडणं एकून, शेजारीपाजारी चौकशीला आले. त्यांनी ब्राह्मणीला धीर दिला. एका शिष्याला ब्राह्मणाच्या शोधावर धाडलं, दुसऱ्याला ब्राह्मणीची देखभाल करायला सांगितलं.

दिवस गेले, महिने गेले, पण ब्राह्मण काही परतला नाही. शोधायला गेलेल्या शिष्याचाही पत्ता नाही.



दिवस भरल्यावर ब्राह्मणीचा प्रसूतिकाळ येऊन ठेपला. तिची देखभाल करणारा शिष्य घाबरून गेला. तो बाहेरच्या अंगणात येऊन बसला.

तितक्यात कुणीतरी दार वाजवले. शिष्याने दार उघडले, तर दारात एक म्हाताराकोतारा एका हातात काठी आणि दुसऱ्या हातात अंगाऱ्याची नरोटी घेऊन उभा असलेला दिसला.

'बाबा, आम्हालाच इथं पंचाईत पडलीय पोटापाण्याची, तू का आलाय डोकं खायला ?'' वैतागलेला शिष्य खेकसला.

'मी भीक मागायला आलेलो नाही. घाबरू नकोस.' म्हातारा म्हणाला.

'मग कशाला आलास इथं ?'

'मला आत घरात जाऊ दे.'

'अरे वा ! ओळख ना पाळख, घरात घुसतोस सरळ. चल नीघ इथून.'

'अरे, नीट समजून घे.'

'काही नको. घरात घेणार नाही.'

'मग माझं मला काम तरी करू दे.' म्हातारा म्हणाला.

'कसलं काम तुझं ?' शिष्यानं विचारलं.

'अरे, या घरात मूल जन्मास येणार आहे. मुलगा आहे. मला त्याच्या कपाळावर ललाटरेखा लिहायच्या आहेत.'

'म्हातारे बुवा, वेड तर नाही लागलं तुम्हाला ? अहो, अशा वेळी पुरुषमाणसांनी कां आत जायचं असतं ?' शिष्य म्हणाला.

'मोठा हटवादी दिसतोय्स तू. बरं ऐक, या घरात ज्या मुलाचा आता जन्म होणार आहे, तो मुलगा जन्माबरोबरच दारिद्र्यही घेऊन येणार आहे. दरिद्रीच आहे तो. त्याच्या नशिबात दारिद्र्यच लिहिलेलं आहे. परंतु त्याच्या घरात काही झालं तरी एक पोत तांदूळ आणि एक गाय राहिलच. याला मात्र कमी पडणार नाही.' म्हातारा म्हणाला आणि काठी टेकीत टेकीत निघून गेला. त्यानं सांगितलेलं भाकित ऐकून चिडलेला शिष्य पुटपुटला, 'एवढं सांगायला यायची काही गरज होती का ?'

दिवसामागून दिवस गेले. काही तरी धडपड करून शिष्याने गुरुचे

घर चालते ठेवले आणि एके दिवशी ध्यानीमनी नसताना अचानकपणेच ब्राह्मण दत्त म्हणून अंगणात उभा राहिला. गुरुला पाहताच शिष्याचा जीव भांड्यात पडला. ब्राह्मणीलाही धीर आला.

ब्राह्मण ओसरीवर आला तो त्याच्या पाठोपाठ भलेमोठे सामान घेऊन नोकरचाकरही आले. ब्राह्मणाचा वेष सुखवस्तू गृहस्थासारखा होता. हातात सोन्याचे जडशीळ कडेही दिसत होते !

घर सोडून ब्राह्मण गेला तो देशीदेशी भटकत राहिला. भटकता भटकता एकदा एका राजधानीत पोचला. तिथल्या राजाने त्याला आपल्या पदरी आश्रय दिला. ब्राह्मणाचे भले दिवस उगवले.

होता होता ही वार्ता तर गावभर पसरलीच पण आसपासच्या पंचक्रोशातही पोचली. जो तो म्हणू लागला, अमुक अमुक ब्राह्मण एकाएकी धनवान झाला. लोकांना ऐकून नवल वाटायचे. ते पत्ता शोधत यायचे. ब्राह्मणाचे घर पाहून जायचे.

दोनएक महिने अशा प्रकारे आनंदात गेले.

आणि मग एके दिवशी सकाळी सकाळीच ब्राह्मणी थडथडा डोके बडवून रडू-ओरडू लागली, 'चोरी झाली, चोरी झाली. चोरांनी सगळं घर धुऊन नेलं.'

खरोखरंच चोरांनी सगळं धन, दागिने, कपडे, भांडी, नाना वस्तू नेल्या होत्या. ठेवलं फक्त घरात एक तांदळाचं पोतं आणि गोठ्यात गाय.

ब्राह्मणाने 'नशीब' म्हणून कपाळाला हात लावला. खिन्न होऊन बसला. ब्राह्मणीने पण आकांत मांडला.

ब्राह्मणाने परत आपला उद्योगधंदा सुरू केला. रडतखडत प्रपंच चालवू लागला.

आणखी काही दिवस गेले. ब्राह्मणापुढं पुन्हा तीच भीती उभी राहिली. ब्रह्मणीला मूल होणार होते. आणखी एक तोंड घरात वाढणार होते. काय करावे ? कसे करावे ?

काळजीत असताना ब्राह्मणाने एके दिवशी पुन्हा घर सोडले. ब्राह्मण गाव सोडून निघून गेला.

ब्राह्मण निघून गेला, ब्राह्मणीने दुःख केले नाही. वाईट वाटून घेतले

नाही. रडली, भेकली नाही. शिष्याने परत गुरुच्या घरचा भार उचलला. कसेबसे चालवू लागला.

काही दिवसांनंतर पुन्हा तीच गोष्ट घडली. तोच म्हाताराकोतारा दारात आला. म्हाताऱ्याला पाहताच शिष्य त्याच्यावर खेकसला,

'पुन्हा कशाला आलास बाबा ? एकदा सांगितलं तर तुझ्यासारख्याला पुष्कळ नाही का ?'

'अरे, असा रागावतोस का म्हणून ? तुला जसं तुझं काम करावं लागतं, तसं मलाही माझं काम करावं लागतं. सगळ्यांनाच आपआपलं काम करावं लागतं.' म्हातारा म्हणाला.

'काय काम आहे तुझं इथं ?' शिष्याने विचारलं.

'तेच. या घरात या खेपेला एक मुलगी जन्म घेणार आहे.'

'मुलगा होऊ दे नाहीतर मुलगी. तुला रे म्हाताऱ्या, काय कर्तव्य ?'

'तेच मुलीच्या कपाळावर ललाटरेखा लिहायच्या आहेत मला.'

'जे काही लिहायचं असेल ते लिही इथूनच. घरात जाऊ देणार नाही'

'बरं, जन्माला येणारी मुलगी जन्मभर कुमारीच राहील. पण तिला मागणी घालण्यासाठी रोज कुणी ना कुणी येतच राहील.' म्हातारा म्हणाला आणि काठी टेकीत टेकीत निघून गेला.

'व्वा ! एवढं सांगण्यासाठी इथवर आला होतास होय रे म्हाताऱ्या ?'

शिष्य भडकून म्हणाला. म्हातारा उत्तर देतो कशाला ?

आणखी काही दिवस उलटले. वर्ष गेली. पण पूर्वीप्रमाणे ब्राह्मण काही परतला नाही. लोक नाना तऱ्हेचे तर्ककुतर्क करू लागले. अफवा उठू लागल्या. कोणी म्हणे, ब्राह्मण अमक्या अमक्या गावात धंदा करीत आहे; तर काणी सांगे, ब्राह्मणाने संन्यास घेतला आहे. कोणी काही, कोणी काही.

हळूहळू सगळेच ब्राह्मणाला विसरून गेले. यथाकाल ब्राह्मणाची मुलं मोठी झाली. शिष्याने त्यांना लिहावाचायला शिकवलं. मुलगा कुटुंबातला धंदा करू लागला. घर चालवू लागला.

मग एके दिवशी शिष्य त्याला म्हणाला, 'हे पहा, मी तुला

घर चालते ठेवले आणि एके दिवशी ध्यानीमनी नसताना अचानकपणेच ब्राह्मण दत्त म्हणून अंगणात उभा राहिला. गुरुला पाहताच शिष्याचा जीव भांड्यात पडला. ब्राह्मणीलाही धीर आला.

ब्राह्मण ओसरीवर आला तो त्याच्या पाठोपाठ भलेमोठे सामान घेऊन नोकरचाकरही आले. ब्राह्मणाचा वेष सुखवस्तू गृहस्थासारखा होता. हातात सोन्याचे जडशीळ कडेही दिसत होते !

घर सोडून ब्राह्मण गेला तो देशीदेशी भटकत राहिला. भटकता भटकता एकदा एका राजधानीत पोचला. तिथल्या राजाने त्याला आपल्या पदरी आश्रय दिला. ब्राह्मणाचे भले दिवस उगवले.

होता होता ही वार्ता तर गावभर पसरलीच पण आसपासच्या पंचक्रोशातही पोचली. जो तो म्हणू लागला, अमुक अमुक ब्राह्मण एकाएकी धनवान झाला. लोकांना ऐकून नवल वाटायचे. ते पत्ता शोधत यायचे. ब्राह्मणाचे घर पाहून जायचे.

दोनएक महिने अशा प्रकारे आनंदात गेले.

आणि मग एके दिवशी सकाळी सकाळीच ब्राह्मणी थडथडा डोके बडवून रडू-ओरडू लागली, 'चोरी झाली, चोरी झाली. चोरांनी सगळं घर धुऊन नेलं.'

खरोखरंच चोरांनी सगळं धन, दागिने, कपडे, भांडी, नाना वस्तू नेल्या होत्या. ठेवलं फक्त घरात एक तांदळाचं पोतं आणि गोठ्यात गाय.

ब्राह्मणाने 'नशीब' म्हणून कपाळाला हात लावला. खिन्न होऊन बसला. ब्राह्मणीने पण आकांत मांडला.

ब्राह्मणाने परत आपला उद्योगधंदा सुरू केला. रडतखडत प्रपंच चालवू लागला.

आणखी काही दिवस गेले. ब्राह्मणापुढं पुन्हा तीच भीती उभी राहिली. ब्रह्मणीला मूल होणार होते. आणखी एक तोंड घरात वाढणार होते. काय करावे ? कसे करावे ?

काळजीत असताना ब्राह्मणाने एके दिवशी पुन्हा घर सोडले. ब्राह्मण गाव सोडून निघून गेला.

ब्राह्मण निघून गेला, ब्राह्मणीने दुःख केले नाही. वाईट वाटून घेतले

नाही. रडली, भेकली नाही. शिष्याने परत गुरुच्या घरचा भार उचलला. कसेबसे चालवू लागला.

काही दिवसांनंतर पुन्हा तीच गोष्ट घडली. तोच म्हाताराकोतारा दारात आला. म्हाताऱ्याला पाहताच शिष्य त्याच्यावर खेकसला,

'पुन्हा कशाला आलास बाबा ? एकदा सांगितलं तर तुझ्यासारख्याला पुष्कळ नाही का ?'

'अरे, असा रागावतोस का म्हणून ? तुला जसं तुझं काम करावं लागतं, तसं मलाही माझं काम करावं लागतं. सगळ्यांनाच आपआपलं काम करावं लागतं.' म्हातारा म्हणाला.

'काय काम आहे तुझं इथं ?' शिष्याने विचारलं.

'तेच. या घरात या खेपेला एक मुलगी जन्म घेणार आहे.'

'मुलगा होऊ दे नाहीतर मुलगी. तुला रे म्हाताऱ्या, काय कर्तव्य ?'

'तेच मुलीच्या कपाळावर ललाटरेखा लिहायच्या आहेत मला.'

'जे काही लिहायचं असेल ते लिही इथूनच. घरात जाऊ देणार नाही'

'बरं, जन्माला येणारी मुलगी जन्मभर कुमारीच राहील. पण तिला मागणी घालण्यासाठी रोज कुणी ना कुणी येतच राहील.' म्हातारा म्हणाला आणि काठी टेकीत टेकीत निघून गेला.

'व्वा ! एवढं सांगण्यासाठी इथवर आला होतास होय रे म्हाताऱ्या ?'

शिष्य भडकून म्हणाला. म्हातारा उत्तर देतो कशाला ?

आणखी काही दिवस उलटले. वर्ष गेली. पण पूर्वीप्रमाणे ब्राह्मण काही परतला नाही. लोक नाना तऱ्हेचे तर्ककुतर्क करू लागले. अफवा उठू लागल्या. कोणी म्हणे, ब्राह्मण अमक्या अमक्या गावात धंदा करीत आहे; तर काणी सांगे, ब्राह्मणाने संन्यास घेतला आहे. कोणी काही, कोणी काही.

हळूहळू सगळेच ब्राह्मणाला विसरून गेले. यथाकाल ब्राह्मणाची मुलं मोठी झाली. शिष्याने त्यांना लिहावाचायला शिकवलं. मुलगा कुटुंबातला धंदा करू लागला. घर चालवू लागला.

मग एके दिवशी शिष्य त्याला म्हणाला, 'हे पहा, मी तुला

माझ्याजवळ होती तेवढी विद्या दिली. हिताच्या चार गोष्टी सांगितल्या. आज आणखी एक गोष्ट सांगतो, लक्ष्य देऊन ऐक.'

'ऐकतो. सांगा.' मुलगा म्हणाला. शिष्याने सांगितले, 'हे पहा, तुमच्या घरात कधीही तांदळाचे पोते ठेवू नकोस आणि गोठ्यात गाय बांधू नकोस. समजलं ?'

'बरं.'मुलगा मान हालवून म्हणाला.

दुसरे दिवशी मुलगा उठला, गाय घेऊन बाजारात गेला. गाय विकून परत आला. घरातले तांदळाचे पोते बाहेर काढले. गोरगरिबांना वाटून टाकले. हात झाडीत ओसरीवर आला तोच गावच्या पाटलाकडून निरोप आला, 'आज पाटलाच्या वडिलांची पुण्यतिथी आहे, गायं आणि तांदळाचं पोतं दान द्यायचं आहे; तेवढं घेऊन जा !'

ब्राह्मणाचा मुलगा उठला. गाय आणि तांदळाचं पोतं घेऊन आला.

दुसऱ्या दिवशी तसंच झालं. चवथ्या दिवशीही तसंच घडलं. ब्राह्मणाचा मुलगा गाय विकायचा, तांदूळ वाटायचा; पण कुणी ना कुणी काही तरी निमित्तानं यायचा, गाय आणि तांदळाचं पोतं देऊन जायचा.

ब्राह्मणकन्याही मोठी झाली होती. विवाहयोग्य बनली होती. एके दिवशी तिलाही बोलवून शिष्याने सांगितले, 'हे पहा, आता तू मोठी झालीस. आता तुला विवाहासाठी मागणी घालायला, पाहायला कोणीना कोणी तरी नित्य येत राहतील. पण एक हजार रुपये आधी घेतल्याशिवाय कोणालाही, कधीही तोंडदेखील दाखवू नकोस; समजलं.'

मुलगी म्हणाली, 'बरं.'

काही दिवसानंतर खरोखरीच ब्राह्मणकन्येला पाहायला कोणी, कोणी येऊ लागले. मुलीच्या सौंदर्याची, शहाणपणाची कीर्ती सगळीकडं गेली होती. त्यामुळं पाहायला येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच राहिली आणि ब्राह्मणाच्या घरात लक्ष्मीदेखील नांदू लागली. ब्राह्मणी संतुष्ट होती. सुखी होती. पैसा होता. खायलाप्यायला होते. आनंद होता.

शिष्याने विचार केला, गुरुच्या पश्चात आपल्यावर पडलेली जबाबदारी आपण पार पाडलेली आहे. सगळे व्यवस्थित आहे. तेव्हा आता आपण आपल्या गावाला परतावे.

आणि एके दिवशी शिष्याने ब्राह्मणी, ब्राह्मणकुमार आणि कुमारी यांचा निरोप घेतला. आपल्या गावाला निघाला.

गावाच्या बाहेर आला तो एक जख्खड म्हातारा त्याला दिसला. म्हाताऱ्याच्या डोक्यावर भरलेले पोते होते. एका हातात बांधलेल्या गायीचे दावे होते. दुसऱ्या हातात काठी होती. लटपटत, डुगडुगत म्हातारा गावाकडे येत होता.

म्हातारा जवळ येताच शिष्याने निरखून पाहिले आणि त्याला भलतेच आश्चर्य वाटले ! कारण तो तोच म्हातारा होता. जो ललाटरेखा लिहिण्यासाठी ब्राह्मणाच्या दारात आला होता. म्हाताऱ्याची तारांबळ पाहून शिष्याला हसू फुटले. तो खो खो हसायला लागला.

हसणाऱ्या शिष्याकडं पाहून म्हातारा धापा टाकीत म्हणाला, 'चांगलं लचांड माझ्या मागं लावून दिलंस. दररोज एक पोतं तांदूळ आणि एक गाय शोधून आणता आणता माझा जीव मेटाकुटीस आला. मुलीला पाहण्याआधी हजार रुपये देणारा माणूससुद्धा सापडणे कठीणच. त्रास होतोय. पण करणार काय ?'

कुरकुरत, गाय हाकत म्हातारा गेला.

म्हाताऱ्याची दशा पाहून शिष्य पुटपुटला, 'भाग्यविधाता भगवान माणसाचे भाग्य लिहितो आणि ते तसे घडवण्यासाठी राबत बसतो. भगवंताची करणी !'

# २

# चतुर अहमद

कोणे एके काळी एका गावात अहमद नावाचा एक मनुष्य रहात होता. तो तसा मूर्ख नव्हता, पण तब्येतीने जरा सुमार होता. त्यामुळे तो आणि त्याची बायको दारिद्र्यात रहात असत. त्याच्यापाशी फक्त एक मेंढ्यांचा छोटा कळप होता. तेवढेच त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन. रोज सकाळी अहमंद मेंढ्यांना चारायला घेऊन जायचा आणि त्याची बायको त्याला रोज एक ताकाचे भांडे त्याच्याबरोबर द्यायची. पण तो कुरणावर मेंढ्या घेऊन गेला रे गेला की, एक लबाड कोल्हा तिथे यायचा, त्याला शेपटीच्या तडाख्याने पाडायचा आणि सारे ताक पिऊन टाकायचा. त्यानंतर एक दुष्ट लांडगा यायचा आणि त्याच्या कळपातील एक मेंढरू खाऊन टाकायचा.

अमहदपाशी सुरुवातीला तीस मेंढ्या होत्या, पण काही दिवसांनी त्याच्यापाशी फक्त पंधरा मेंढ्या राहिल्या. खुद्द अहमद अगदी अस्थिपंजर होऊन गेला. यात आणखी भरीत भर म्हणून की काय, जवळच्या पर्वतामध्ये एक भयानक राक्षस आला होता.

एकदा तो अहमदपाशी आला आणि म्हणाला, 'अहमद, मला तुझ्या साऱ्या मेंढ्या देऊन टाक !'

हा म्हणजे अगदी कळसच होता. अहमद ताठ उभा राहून म्हणाला, 'देणार नाही, चालता हो !'

राक्षस म्हणाला, 'बऱ्या बोलाने देत नाहीस काय ? बरं तर, आपण कुणाची ताकद जास्त आहे हे पाहू या आणि जो जिंकेल त्याच्या मेंढ्या.

'कबूल ?'

अहमदची घाबरगुंडी उडाली; पण त्याने कबूल केले. राक्षस म्हणाला, 'प्रथम आपण एकेक डोंगर उखडून टाकायचा. उद्या याच ठिकाणी ये. मी दक्षिणेकडचा डोंगर उखडून टाकीन आणि तू उत्तरेकडचा उखडून टाक !'

अहमद म्हणाला, 'ठरलं !'

सकाळी राक्षस आला. त्याने दक्षिणेकडचे दोन डोंगर शिखरांना पकडून दोन हाताने उपटले. एकमेकांवर आदळले. डोंगर भुईसपाट झाले आणि ते जेथे उभे होते ती जमीन अगदी सपाट होऊन गेली.

अहमदची पाळी आली. तो उत्तरेकडच्या डोंगरावर गेला. त्याने तो डोंगर हलविण्याचा प्रयत्न केला. पण छे, डोंगर कसला हालतो !

'का, तू डोंगर उखडून का टाकत नाहीस ?' राक्षसाने विचारले.



'का काय विचारतोस ? हा डोंगर म्हणजे पृथ्वीचा कणा आहे. तो हलविला तर सारी पृथ्वीच निखळून पडेल.' अहमदने उत्तर दिले.

'माणूस मोठा हुशार आणि ताकदवान दिसतोय ?' राक्षसाच्या मनात आले. तो आदराने लवून म्हणाला, 'बरोबर आहे महाराज. आपण हा पर्वत उखडून टाकू नका. या शर्यतीत मी हरलो. पण उद्या आपण जंगलातील सारी झाडे तोडू या. मी दक्षिणेकडची तोडीन, तुम्ही उत्तरेकडची तोडा.'

अहमदने कबूल केले. त्याला आता अधिक विश्वास आला होता. राक्षस जरी ताकदवान असला तरी बुद्धीने मंद आहे हे त्याला एव्हाना कळले होते.

सकाळी राक्षसाने अगदी सहजपणे दक्षिणेच्या जंगलातील सारी झाडे तोडून साफ करून टाकली. मग अहमद उत्तरेच्या जंगलात एकट्याच उभ्या असलेल्या एक पॉप्लर वृक्षापाशी गेला आणि त्याने त्या वृक्षाकडे खालून न्याहाळून पाहण्यास सुरुवात केली. राक्षस त्याच्यापाशी आला आणि म्हणाला, 'का, इतकं न्याहाळून का पाहताय ?'

'हा पॉप्लर आहे. पृथ्वीवरील सर्व वृक्षांचा हा राजाच जर मी पाडून टाकला तर बाकीची झाडे जमिनीत गाडून घेतील आणि आपल्याला सरपणच उरणार नाही. मग आपण अन्न कसे शिजवणार ? आपण सारे उपाशी मरू.' अहमद म्हणाला.

'हात नका लावू. आहे तसाच ठेवा त्याला.'

राक्षस ओरडला, 'मी याही बाबतीत पराभव मान्य करतो. आपण उद्या याच ठिकाणी येऊ या आणि जमिनीवर पाय असे आपटू या की, जो कोणी जमिनीत घुसेल ते विजयी होईल.'

एवढे बोलून ते आपापल्या घरी गेले.

अहमद घरी आला आणि आपल्या बायकोला म्हणाला, 'हे बघ, पखालीत ताक भर आणि उद्या मला जाताना दे.'

बायकोने त्याने सांगितल्याप्रमाणे केले. पहाटे अहमद उठला. ताकाची पखाल घेऊन जागेवर आला आणि त्याने ती पखाल जमिनीच्या खाली थोडी पुरून ठेवली. तो राक्षसाची वाट पाहत बसला. राक्षसाने पाय

दणकन् आपटले आणि तो कमरेपर्यंत जमिनीत गेला. आता अहमदची पाळी आली. त्याने जिथे पखाल गाडली होती तिथेच पाय आपटले. पखाल फुटली आणि ताक जमिनीतून फसकन् बाहेर आले.

'बघ तू पाय आपटलेस आणि तू कमरेपर्यंत जनिमीत घुसलास. मी पाय आपटले आणि जमिनीचा मेंदूच मुळी बाहेर पडला.' अहमदने सांगितले.

राक्षसाने पुन्हा आपला पराभव मान्य केला. निघताना त्याने दुसऱ्या दिवशी अहमदला आपल्या घरी जेवायला येण्याचे आमंत्रण दिले. दुसऱ्या दिवशी अहमद राक्षसाच्या घरी गेला. राक्षसाने त्याला चिक्कार खायला घातले, दारू पाजली. त्याने अहमदच्या झोपण्याची सोय केली. आता त्याने अहमद झोपलेला असतानाच त्याला ठार मारण्याचा बेत केला होता. अहमदने हे ओळखले आणि राक्षस झोपी गेल्याबरोबर तो हळूच उठला. त्याने आपल्या बिछान्यावर एक लाकडाचा ओंडका आणून ठेवला. राक्षसाला जेव्हा जाग आली तेव्हा त्याने आपली गदा उचलली आणि सारे बळ एकवटून ती ओंडक्यावर आदळली. अहमद ठार मेला असे समजून 'चला सुटलो एकदाचा, अहमद तर मरून गेला' असे मनाशी बोलून तो परत डाराडूर झोपी गेला. जरा वेळाने अहमदने तो ओंडका जागच्या जागी नेऊन ठेवला आणि स्वतः आपल्या जागेवर झोपला.

सकाळी तो राक्षसाच्या अगोदर उठला. राक्षसाने डोळे उघडले आणि पाहिले तर अहमद त्याच्यापुढे जिवंत उभा होता. त्याच्या भीतीने थरकापच झाला. त्याने आपल्या पाहुण्याला बसूवन घेतले आणि चहा दिला.

'महाराज, झोप कशी झाली ? स्वप्नं नाही ना पडली ?' राक्षसाने विचारले.

'मला छानच झोप आली. स्वप्न वगैरे काही नाही. पण मला डास किंवा माशीबिशी चावली असावी असं वाटतं.'

अहमदच्या या उत्तराने तर राक्षस पार हादरून गेला. तो अधिकच घाबरला. 'काय ताकदवान मनुष्य आहे हा ! मी याला गदेने मारले तर हा म्हणतो, मला डास नाही तर माशी चावली असेल. तो मला आवरायचा नाही.' राक्षसाने असा विचार केला आणि पळत सुटला

तो जीव घेऊन पळत असतानाच त्याला वाटेत कोल्हा आणि लांडगा भेटले.

'कारे बाबा, तू पळतोस का ?' त्यांनी राक्षसाला विचारले.

राक्षस म्हणाला, 'अहमद पैलवानाची मला भीती वाटते, म्हणून मी पळतो.'

'मूर्खच आहेस अगदी' कोल्हा आश्चर्याने थक्क होऊन ओरडला, 'मी त्याला अनेक वेळा शेपटीच्या फटकाऱ्याने पाडले आहे आणि त्याचे ताक पिऊन टाकले आहे.'

'आणि मी त्याची मेंढरे गट्ट केली आहेत.' लांडगा म्हणाला.

'छे, शक्यच नाही हे !' राक्षस जोरात ओरडला.

त्या दोघांनी रक्षसाचे मन वळविले आणि ते तिघेजण अहमदकडे निघाले.

ते तिघे बरोबर चालले होते. राक्षस मध्ये होता आणि त्याच्या उजव्या बाजूला कोल्हा आणि डाव्या बाजूला लांडगा चालला होता इतक्यात त्यांना अहमद त्यांच्याकडे येताना दिसला.

अहमद लांबूनच ओरडला, 'छान केलेत दोस्तांनो ! राक्षसाला पकडून आणलेत, फारच छान !'

हे ऐकताच राक्षस रागाने आणि भीतीने बेभान झाला. त्याने एकाच फटक्यात कोल्हाला आणि लांडग्याला ठार मारले.

'अहमदला भिऊन मी पळून गेलो असे लोकांनी मला चिडवण्यापेक्षा मी मरून जाईन !' राक्षस स्वत:शीच म्हणाला आणि त्याने एका उंच कड्यावरून उडी टकून जीव दिला.

अशा प्रकारे अहमदने आपल्या सर्व शत्रूंचा नि:पात केला.

'ताकदवान मनुष्य फक्त एकाचाच पराभव करतो पण चतुर माणूस अनेकांना जिंकतो.' असे म्हणतात ते उगीच नाही.



३

# भुताला भेटला गुरू

कोकणात भुताखेतांवर विश्वास ठेवणारे लोक फार! अंधश्रद्धाच ती. तिचा परिणाम लोकांच्या कर्तृत्वशक्तीवर होतो. लोक हतबल बनतात. भुताखेतांना घाबरून आपले नित्य व्यवहारही बंद ठेवतात. लोकांना भुताखेतांचे भय दाखवून त्यावर आपली पोळी पिकवणारेही काही कमी नसतात. पण अशा पोळांनाही चांगलाच पोळणारा भेटला की, हे पोळ गोगलगाय बनतात. अशाच एका पोळाची ही लहानशी गोष्ट.

गणूभटजी आणि पार्वतीकाकू हे दोघे म्हातारे पती-पत्नी कोकणात आडिवाऱ्याला राहात. त्यांना मूल ना बाळ! पन्नास वर्षे दोघांचा सुखसमाधानाने संसार चालला होता. गावच्या लफड्या-भानगडीत ते बिचारे कधी पडत नसत. आपण बरं की आपलं घर बरं. दोघेही स्वभावाने मोठे मायाळे होते. गणूभटजी मायाळू खरे पण पक्के व्यवहारी. कोणत्याही गोष्टीची पारख खरे खोटे तपासून, नीट निरखून, थोड्याशा संशयाने ते करीत. दोघे पतीपत्नी खाऊन पिऊन सुखी होते. त्यांची नारळ, आंबे, केळी यांची मोठी बाग होती. दोघामागे ही संपत्ती कोणाला मिळणार याची त्यांच्यापेक्षा गावकऱ्यांनाच मोठी चिंता!

आडिवाऱ्याला सदूभटजी म्हणजे एक प्रस्थ होते. त्यांना याच चिंतेने ग्रासले. अलिकडे चारचौघात् गप्पा करताना ते हीच आपली चिंता दाखवीत. मित्रमंडळीतून गप्पा करून घरात आल्यावर आपल्या बायकोपुढेही

पुन्हा तेच. सुभद्राकाकू या बडबडीने अगदी कंटाळून जात.

आणि एक दिवस गावात बातमी उठली! सदूभटजीच्या अंगात भूत संचारले! ते अनेक गूढे उकलतात. लोकांच्या अडीअडचणी निवारू शकतात. मोठ्यामोठ्या भुतांना काबूत ठेवू शकतात. त्यांच्यावर हुकमत गाजवू शकतात. गावातील पिडलेले, अडलेले लोक सदूभटजींच्या घरी सकाळ-संध्याकाळ रांगा लावू लागले. गावात सर्वांच्या तोंडी सदूभटजींच्या अचाट सामर्थ्यविषयी नानाप्रकारचे तर्कवितर्क सुरू झाले.

गावात झाले ते गणूभटजीच्या घरात झाल्याबाचून कसे राहील? पार्वतीकाकू एक दिवस देवदर्शनाहून दुपारच्या सुमारास घरी आल्या. थोड्याच वेळात गणूभटजीही बागेतून थकून भागून घरी येऊन पोचले. जरा खाणे पिणे, थोड्याशा गप्पा झाल्यावर पार्वतीकाकू गणूभटजींना म्हणाल्या, 'अहो ऐकलंत का! मी एक तुम्हाला विचारू का?'

गणूभटजी म्हणाले, 'काय विचारायचे आहे, विचार.'

'अहो गावात सदूभटजी संबंधी तुम्ही ऐकलंत का? त्यांना म्हणे भुतं वश आहेत. त्यांना प्रत्येक माणसाचं पुढचं भविष्य दिसतं. मग मी म्हणते त्यांना विचारू या का? आपल्याला मूल नाही बाळ नाही, पुढे या नारळी-केळीच्या बागांचं काय करायचं?' पार्वतीकाकू म्हणाल्या.

गणूभटजी थोडे हसले! विषण्ण चेहेऱ्याने ते म्हणाले, 'अगं, आता आपलं काय राह्यलंय! बागांचं मी ठरवलंय की गावातल्या कुणा होतकरू, सज्जन माणसाला द्यावयाच्या! सदूबद्दल विचारशील तर त्याला मी लहानपणापासून ओळखतो. तो एक लबाड आणि दुष्ट मनुष्य आहे. त्याच्यापासून दोन पावलं लांबच राहिलेलं बरं! त्या ढोंग्याला कुठलं लोकांचं भविष्य समजणार?'

गणूभटजी बोलायचे थांबले आणि पार्वतीबाईंच्या आशेवर पाणी पडले. त्या चिंताग्रस्त झाल्या. त्यांना काही कामच सुचेना. पत्नीची अवस्था गणूभटजींनी. जाणली. पण जे सत्य होते ते कितीही कठोर असले तरी सांगणे, अशी गणूभटजींची आजवरची स्वभावाची घडण होती.

काही दिवस गेले. पार्वतीबाईंना गणूभटजींचे मत काही केल्या

पटत नव्हते. पण त्या आपले म्हणणे स्पष्टपणे गणूभटजींना सांगू शकत नव्हत्या.

एक दिवस पहाटेच गणूभटजी जरा कामाला म्हणून पलिकडच्या गावाला निघाले. वाटेत नदी. नावाड्याने गणूभटजी एकटेच म्हणून जरा खळबळ केली. गणूभटजींनाही जरा विचित्रच वाटले. बरेच आढेवेढे घेतल्यावर नावाडी गणूभटजींना घेऊन निघाला. पैलतीरावर गणूभटजींना पोचवून नावाडी परतला.

दिवसाचे काम आटोपून गणूभटजी परत आपल्या गावाकडे निघाले. रात्र होत होती. झपाझप पावले टाकत गणूभटजी नदीतीरावर आले. तो त्यांना किनाऱ्यावर कोणीच दिसेना ! वारे घोंघावत होते. लाटा फेसाळत होत्या. धो धो असा सारखा पाण्याचा संथ आवाज येत होता. गणूभटजींना चिंतेने ग्रासले. दूरवर डोक्यावर इरले घेतलेला एक इसम येत होता. त्याचे केस, दाढी, मिशा वाढल्या होत्या. डोळे तांबारले होते. काळोखात त्याचे अंग अधिकच काळे दिसत होते. अंधारामुळे गणूभटजी त्याला नीटसे ओळखू शकले नाहीत.



तो इसम गणूभटजीकडे नजर रोखून म्हणाला,

'तुम्हाला पलिकडच्या गावाला जायचं का?'

'हो पण इथं तर कुठं नाव नाही!' गणूभटजी म्हणाले.

'अहो, त्यात काय! मी माझ्या खांद्यावरून तुम्हाला पलिकडे नेतो. मला उत्तम पोहता येते.' तो इसम म्हणाला.

गणूभटजी जरा चरकलेच. पण रात्री अपरात्री का होईना आपण घरी पोचू या विचाराने त्या इसमाच्या खांद्यावरून नदी पार करण्याचे त्यांनी ठरवले.

गणूभटजींचा होकार मिळताच त्या इसमाने आपल्या डोक्यावरचे इरले काढले. तो शेंडी भुरभूरू लागली. गणूभटजी आश्चर्यचकीत झाले. त्यांना त्या इसमाचा चेहरा ओळखीचा वाटला. आता ते दोघे नदीत उतरू लागले. त्या इसमाच्या खांद्यावर गणूभटजी चढले.

हळूहळू, पोहत पोहत तो इसम गणूभटजींना पैलतीरी नेत होता. वाटेत गणभटजीच्या गावच्याही गप्पा मारत होता. आपल्या गावची एवढी खडान् खडा माहिती या इसमाला कशी? गणूभटजी चरकलेच! दोघेजण बोलता बोलता नदीच्या मध्यावर येऊन पोचले.

तोच तो इसम गणूभटजींना म्हणाला, 'गणूभट, मी भूत आहे.' गणू भटजी एकदम बावचळले. तो इसम बोलतच होता, 'तुमच्या गावात सदूभट आहेत ना, त्यांनी मला एक काम सांगितलं आहे. तुमच्या आंब्या-नारळाच्या बागा आहेत म्हणे! तुम्हाला मूळबाळ काही नाही. मग करायच्या काय त्या बागा! त्या बागांचे दानपात्र तुम्ही मुकाट्याने सदूभटांना द्या! नाहीतर तुमची धडगत नाही. मी रोज तुम्हाला छळेन! तुम्हाला सतावून सोडेल! बऱ्या बोलानं माझं म्हणणं मान्य करा. गणूभट नाही तर आता तुमची धडगत नाही. तुम्ही जर ऐकणार नसाल तर तुम्हाला इथल्या नदीत बुडवून टाकीन! जरा तुमच्या बायकोचा, धरा-दाराचा, बाग-बगीचांचा विचार करा.'

गणू भटजींनी प्रसंगावधानं राखले त्यांना एक युक्ती सुचली. त्यांनी त्या इसमाची शेंडी पकडल्यावर तो इसम बराच नरम झाला. गणू भटजी म्हणाले, 'अरे, घरी तरी चल. माझा बाग-बगीचा कोणाला तरी

देणारच आहे. पण शेवटी एकदा माझ्या बायकोची मला भेट घेऊ दे. तिचा विचार घेऊ दे.' तो इसम म्हणाला , 'मी तुम्हाला घरी नेतो पण प्रथम माझी शेंडी सोडा.' गणू भटजी शेंडी आणखीनच जास्त खेचून म्हणाले, 'मरे इथं वरती मी लटपटतोय तेवढाच शेंडीचा मला आधार !'

बऱ्या बोलानं तो इसम मार्ग कापीत कापीत नदी पैलतीरी पोचला. गणू भटजींना खाली उतरविणार तोच गणू भटजी म्हणाले, 'अरे इथवर घेऊन आलास पण माझ्या घरापर्यंत मला घेऊन चल. तेवढीच शेवटची इच्छा तू पूर्ण कर.' मुकाट्यानं तो गणू भटजींच्या घराची वाट चालू लागला. गणू भटजींनी अजून काही त्याची शेंडी सोडली नव्हती. दोघं गणू भटजीच्या घराच्या परसात आले. तोच गणू भटजी ओरडले, 'अग, लवकर बाहेर ये आणि येताना एक कात्री घेऊन ये बरं.'

पार्वतीबाई कात्री हातात घेऊन बाहेर आल्या आणि किंचाळल्या, 'अहो सदूभटजींच्या डोक्यावर काय बसलात ? उतरा खाली.' गणू भटजी म्हणाले, 'काही बोलू नको. झटकन कात्री दे.'

पार्वतीबाईच्या हातून कात्री घेत गणू भटजी म्हणाले, 'अग, वाडवडील सांगत आले भुताची शक्ती म्हणे त्याच्या केसात असते.' आणि असे म्हणून गणू भटजींनी त्यांना घेऊन आलेल्या सदूभटाजी शेंडी मूळासकट कापून टाकली. सदूभटाने गणूभटजींना लगेच खाली उतरवून पळ काढला.

'अग, भुतांची मर्मस्थाने त्यांनाच माहीत ! आपण आपलं त्यांच्या मर्मस्थानाचं नीट स्मरण ठेवावं इतकंच.'

# ४

# लालजी आणि प्रेमजी

एका गावात एक म्हातारा रहात होता. त्याचं नाव होतं लालजी. लालजीचे केस पिकले, तरी डाकूगिरी करीतच होता. लालजी आपल्या भागात प्रसिद्ध डाकू होता. तो आपल्या कलेत निष्णात होता. आपल्या तारुण्यात त्याने आपल्या कामात मोठे चातुर्य दाखविले होते आणि मोठमोठे डाके सहजतेने घातले होते. आता तो म्हातारा झाला होता. तरीसुद्धा त्याचा उत्साह कमी झालेला नव्हता. मनाने तो अगदी तरुण होता. या वयातही साहसी डाकूगिरी करण्यासाठी तो तयार असे. परंतु त्याला एक काळजी अलीकडे लागून राहिली होती. ती अशी की, माझ्या पश्चात असे साहस आणि असे चातुर्य कोण दाखविल ? या कलेत कोण पारंगत होईल ? कोणाला मी माझी कला शिकवू ? कोण ही कला शिकण्यासाठी तयार होईल ? त्याच्या अवतीभोवती जे तरुण होते, त्यांच्यात असे चातुर्यही नव्हते आणि उत्साहही नव्हता. सारे चाकोरीतले जीवन जगणारे होते.

परंतु त्या सुमारास उत्तरेकडल्या नाथाजीच्या डोंगराळ भागात प्रेमजी नावाचा एक माणूस डाके घालण्याविषयी प्रसिद्ध होऊ लागला होता. त्याच्या चातुर्याच्या व साहसाच्या गोष्टी लालजीच्या कानावर आल्या. लालाजीला थोडी [illegible]ज वाटली आणि तो त्याला भेटण्यासाठी उत्सुक झाला.

एके दिवशी लालजी उंटावर स्वार होऊन नाथाजीच्या डोंगराकडे निघाला. उन्हाळ्याचे दिवस होते. ऊन कडक पडलं होतं. घामाच्या धारा लागल्या होत्या. उकाड्याने जीवाची तगमग होत होती. जाता जाता रस्त्याच्या कडेला दाट चिंचेची झाडे दिसली. तिथे गार सावलीत दुपारची वेळ काढावी असा लालजीने विचार केला. तो उंटावरून उतरला. एका झाडला उंट बांधला. स्वत: भांग घोटीत बसला. तेवढ्यात दुसऱ्या एक उंटावरचा स्वार तिथे आला. त्यानेही आपला उंट एका झाडाला बांधला. लालजीचे आणि त्याचे संभाषण सुरू झाले. एकमेकांनी एकमेकांची विचारपूस केली. बोलता बोलता लालजीने त्याला विचारले,

'आपण कुठले राहणार?'

'मी नाथाजीच्या डोंगराकडे राहतो.' त्या माणसाने उत्तर दिले. त्याबरोबर लालाजीने त्या माणसाकडे रोखून पाहिले. त्याच्या डोळ्यांतले तेज पाहताच लालजीने त्याला ओळखले. लालजीने त्याला विचारले,

'तुझं नाव प्रेमजी आहे. होय ना?'

यावर तो माणूस म्हणाला, 'होय आणि तुमचं नाव लालजी आहे. होय ना?' अशा प्रकारे अचानक एकमेकांशी भेट झाल्याबद्दल दोघांना आनंद झाला. दोघांनीही एकमेकांना आलिंगन दिले. दोघांनी मिळून भांग घेतली आणि बराच वेळ बोलत बसले. बोलता बोलता दुपार टळली. दोघेही उठले आणि पुढे जाण्यास निघाले. निघण्यापूर्वी लालजीच्या मनात प्रेमजीची परीक्षा घ्यावी असे आले. त्याने चार पांढरे दगड घेतले आणि प्रेमजीच्या हातात देत म्हटले,

'समोरच्या झाडावर पक्ष्याचं घरटं आहे. घरट्यात चार अंडी आहेत. पक्षी घरट्यातून ये-जा करीत आहेत. तू तेवढी अंडी पक्षाला न कळत उचलून त्या जागी हे दगड ठेवून ये पाहू.'

ते दगड घेऊन प्रेमजी झाडावर चढला आणि पक्षी उडून गेले की हळूच घरट्यातले अंडे उचलून त्या जागी दगड ठेवू लागला. अशा प्रकारे त्याने घरट्यातही चारही अंडी उचलून खिशात टाकली. आणि खाली उतरून लालजीला खिशातली अंडी दाखवू लागला. पण अंड्यांऐवजी खिशातून चार दगडच निघाले. ते पाहून लालजी खो-खो हसू लागला.

प्रेमजी खजिल झाला. लालजीने प्रेमजी झाडावरून खाली उतरत असतानाच त्याच्या खिशातली चार अंडी काढून घेऊन त्याऐवजी चार दुसरे दगड ठेवले होते. पण हे प्रेमजीला मुळीच कळले नव्हते. लालजीची चलाखी पाहून प्रेमजी थक्क झाला.

नंतर दोघे उंटावर स्वार होऊन एका शहरात गेले. त्या शहरात एक राजमहल होता. त्या महालाचे कळस सोन्याचे होते. ते कलश उतरवण्याची युक्ती दोघेही शोधू लागले. जस जशी रात्र वाढू लागली. आणि राजमहालावरच्या घड्याळाचे टोले पडू लागले तसतसे दोघेही राजमहालाच्या दरवाज्यावर खिळे ठोकत गेले. रात्रीचे बाराचे ठोके पडले. त्यावेळी त्यांचे बारा खिळे ठोकून झाले होते. दोघेही त्या खिळ्यांच्या साहाय्याने कळसापर्यंत चढून गेले आणि कळस कापू लागले.

जवळच एका सोनाराचे घर होते. सोनार जागा झाला. कुठेतरी सोने कापले जात आहे याची त्याला चाहूल लागली. सोनार चटकन उठला



आणि बाहेर आला. पाहतो तर दोन इसम राजमहालाचे सोन्याचे कळस कापत असल्याचे त्याला दिसले. थोड्याच वेळात लालजी व प्रेमजी सोन्याचे कळस घेऊन खाली उतरले आणि चूपचाप गावाबाहेरील स्मशानाकडे गेले. सोनारही लपत छपत त्यांच्या पाठोपाठ गेला. स्मशानात काही प्रेते पडलेली होती. सोनारही त्यात प्रेतासारखा पडून राहिला. प्रेमजीने जवळच एक खड्डा खणला आणि त्यात तो कळस पुरण्याचा विचार केला. तत्पूर्वी लालजीने प्रेताला भाला भोसकून कोणी जिवंत नाहीना याची खात्री करून घेतली. सोनाराला भाला टोचला. पण त्याने चलाखीने भाल्याच्या टोकाला लागलेले रक्त पुसून टाकले. ते दोघांच्याही लक्षात आले नाही व ज्या अर्थी भाल्याच्या टोकाला रक्त लागलेले नाही त्या अर्थी ही सगळी मृत असून जिवंत कोणीच नाही अशी त्यांची खात्री झाली. मग त्यांनी तो कलश खड्डयात पुरला व ते निघून गेले.

लालजी आणि प्रेमजी निघून गेल्यानंतर सोनार उठला, जखमेवर पट्टी बांधली आणि खड्डा उकरून कलश घेऊन घरी गेला. दुसऱ्या दिवशी रात्री लालजी आणि प्रेमजी कलश घेण्यासाठी तिथे आहे. खुणेच्या जागी यांनी उकरून पाहिले पण कलश मिळाला नाही. तेव्हा लालजीच्या लक्षात आले की कालच्या प्रेतांत निश्चितच कोणी तरी जिवंत इसम असला पाहिजे व त्यानेच कलश पळवला असला पाहिजे दोघानीही मग कलश नेणाऱ्याचा शोध करण्याचे ठरविले.

दोघांनी कांदे आणि हळद विकण्याचा ठेका घेतला. त्या शहरात त्या दोघांशिवाय कुणालाही कांदे आणि हळद विकण्याचा अधिकार नव्हता. लालजीने हळदीचे दुकान घातले. आणि प्रेमजीने कांद्याचे दुकान घातले. तराजू घेऊन दोघेही माल तोलू लागले.

थोड्या वेळाने एक बाई रडत-ओरडत दुकानात आली. ती म्हणत होती, 'हे कसले राज्य ? हळद आणि कांद्याचाही येथे ठेका दिला जातो.' लालजी आणि प्रेमजी उमगले. लगेच त्या बाईच्या मागोमाग प्रेमजी लपत छपत गेला. तिच्या घराजवळ पोहचला. तेव्हा एक इसम कण्हत-ओरडत असल्याचा आवाज त्यांच्या कानी आला. तो इसम म्हणत होता, 'इतका वेळ कुठं गेली होतीस? मी इथं मरायला टेकलो आहे माझ्या जखमेवर



म. ग्रं. सं. ठाणे ... शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. 3545 दिनांक ...

प्रेमजी खजिल झाला. लालजीने प्रेमजी झाडावरून खाली उतरत असतानाच त्याच्या खिशातली चार अंडी काढून घेऊन त्याऐवजी चार दुसरे दगड ठेवले होते. पण हे प्रेमजीला मुळीच कळले नव्हते. लालजीची चलाखी पाहून प्रेमजी थक्क झाला.

नंतर दोघे उंटावर स्वार होऊन एका शहरात गेले. त्या शहरात एक राजमहल होता. त्या महालाचे कळस सोन्याचे होते. ते कलश उतरवण्याची युक्ती दोघेही शोधू लागले. जस जशी रात्र वाढू लागली. आणि राजमहालावरच्या घड्याळाचे टोले पडू लागले तसतसे दोघेही राजमहालाच्या दरवाज्यावर खिळे ठोकत गेले. रात्रीचे बाराचे ठोके पडले. त्यावेळी त्यांचे बारा खिळे ठोकून झाले होते. दोघेही त्या खिळयांच्या साहाय्याने कळसापर्यंत चढून गेले आणि कळस कापू लागले.

जवळच एका सोनाराचे घर होते. सोनार जागा झाला. कुठेतरी सोने कापले जात आहे याची त्याला चाहूल लागली. सोनार चटकन उठला



आणि बाहेर आला. पाहतो तर दोन इसम राजमहालाचे सोन्याचे कळस कापत असल्याचे त्याला दिसले. थोड्याच वेळात लालजी व प्रेमजी सोन्याचे कळस घेऊन खाली उतरले आणि चूपचाप गावाबाहेरील स्मशानाकडे गेले. सोनारही लपत छपत त्यांच्या पाठोपाठ गेला. स्मशानात काही प्रेते पडलेली होती. सोनारही त्यात प्रेतासारखा पडून राहिला. प्रेमजीने जवळच एक खड्डा खणला आणि त्यात तो कळस पुरण्याचा विचार केला. तत्पूर्वी लालजीने प्रेताला भाला भोसकून कोणी जिवंत नाहीना याची खात्री करून घेतली. सोनाराला भाला टोचला. पण त्याने चलाखीने भाल्याच्या टोकाला लागलेले रक्त पुसून टाकले. ते दोघांच्याही लक्षात आले नाही व ज्या अर्थी भाल्याच्या टोकाला रक्त लागलेले नाही त्या अर्थी ही सगळी मृत असून जिवंत कोणीच नाही अशी त्यांची खात्री झाली. मग त्यांनी तो कलश खड्डयात पुरला व ते निघून गेले.

लालजी आणि प्रेमजी निघून गेल्यानंतर सोनार उठला, जखमेवर पट्टी बांधली आणि खड्डा उकरून कलश घेऊन घरी गेला. दुसऱ्या दिवशी रात्री लालजी आणि प्रेमजी कलश घेण्यासाठी तिथे आहे. खुणेच्या जागी यांनी उकरून पाहिले पण कलश मिळाला नाही. तेव्हा लालजीच्या लक्षात आले की कालच्या प्रेतांत निश्चितच कोणी तरी जिवंत इसम असला पाहिजे व त्यानेच कलश पळवला असला पाहिजे दोघानीही मग कलश नेणाऱ्याचा शोध करण्याचे ठरविले.

दोघांनी कांदे आणि हळद विकण्याचा ठेका घेतला. त्या शहरात त्या दोघांशिवाय कुणालाही कांदे आणि हळद विकण्याचा अधिकार नव्हता. लालजीने हळदीचे दुकान घातले. आणि प्रेमजीने कांद्याचे दुकान घातले. तराजू घेऊन दोघेही माल तोलू लागले.

थोड्या वेळाने एक बाई रडत-ओरडत दुकानात आली. ती म्हणत होती, 'हे कसले राज्य ? हळद आणि कांद्याचाही येथे ठेका दिला जातो.' लालजी आणि प्रेमजी उमगले. लगेच त्या बाईच्या मागोमाग प्रेमजी लपत छपत गेला. तिच्या घराजवळ पोहचला. तेव्हा एक इसम कण्हत-ओरडत असल्याचा आवाज त्यांच्या कानी आला. तो इसम म्हणत होता, 'इतका वेळ कुठं गेली होतीस? मी इथं मरायला टेकलो आहे माझ्या जखमेवर



म. सं. ठाणे, बाल... शाखा
बाल ... विभाग
क्र. ३५४८ दिनांक २८/१/८८

ताबडतोब इलाज कर.' ती बाई म्हणाली 'काय सांगायचं ? हळद आणि कांद्याचा ठेका दोघाच व्यापाऱ्यांना मिळाल्यामुळे त्यांना शोधायला उशीर झाला.'

सोनारही मनात उमगला. तो म्हणाला, 'आपल्या दारावर बाहेर कोणी निशाणी केली आहे का पाहा बरं !

त्या बाईने झटकन बाहेर येऊन पाहिले तर दारावर खरोखरच चौकडी काढलेली होती. सोनार तिला म्हणाला, 'गल्लीतल्या घरांच्या दारावरही अशीच चौकडी काढून ये.'

रात्र झाली, गाव शांत झाले. प्रेमजी आणि लालजी सोनाराच्या गल्लीत आले. लालजीने विचारले, 'कोणते घर सोनाराचे ?'

'चौकडीची खूण दारावर असलेले.' प्रेमजी म्हणाला, परंतु त्या गल्लीत सगळयाच दारावर चौकडीच्या खुणा आढळल्या. लालजीच्या लक्षात सोनाराची चलाखी आली. मग तो प्रेमजीला म्हणाला, 'आता घराच्या मागील बाजूला जाऊन कान लावला पाहिजे !' दोघांनीही त्याप्रमाणे कान टवकारून घराघरांतली कुबजूब ऐण्यास सुरुवात केली. सोनार जखमेच्या वेदनेमुळे कण्हत होताच. त्याचे कण्हणे ऐकताच लालाजी म्हणाला, 'हेच घर आहे.'

दोघांनीही मग हळूच सोनाराच्या घरात प्रवेश केला. आणि सोन्याचा कलश, आणखीही काही सोने, रूपे लांबविले. सोन्याचे दागिनेही पळवले. दोघेही गावच्या बाहेर आले आणि चोरून आणलेल्या दागिन्यांची वाटणी करू लागले. दोन सारख्या वाटण्या केल्यावर एक पैंजणाचा जोड उरला. लालाजी म्हणाली, 'माझी बायको आता म्हातारी झाली आहे. तेव्हा तूच हे पैंजण घेऊन जा.'

प्रेमजी म्हणाला, 'तसे कशाला, एक पैंजण तू घे. एक पैंजण मी घेतो. वाटणी बरोबर झाली पाहिजे.'

'तुझी मर्जी.' लालजी म्हणाला, 'मागून पश्चाताप मात्र करू नकोस.'

दोघेही आपापल्या घरी गेले. प्रेमजीने ढीगभर आणलेले दागिने पाहून त्याची बायको खूष झाली. एकेक दागिना अंगावर घालण्यास तिने सुरुवात केली. घालता घालता एकच पैंजण तिला दिसला. तसा तिला

राग आला. दुसरा पैंजण आणण्यास तिने प्रेमजीला सांगितले. तिने हट्ट धरला म्हणून प्रेमजी उठला आणि लालजीच्या गावी आला. रात्रीची वेळ होती. लालजीची म्हातारी बायको एकाच पायात पैंजण घालून झोपली होती. लालजी कोठेतरी बाहेर गेला होता. प्रेमजीने मोठ्या चतुराईन म्हातारीच्या पायातला पैंजण काढून घेतला आणि गावी निघून आला.

थोड्या वेळाने लालजी घरी परतला. पाहतो तर बायकोच्या पायात पैंजण नाही. प्रेमजी येऊन गेल्याचे ताबडतोब त्याच्या लक्षात आले. त्याला प्रेमजीचा फार राग आला. तो तसाच प्रेमजीच्या घरी आला. त्यावेळी प्रेमजीची बायको दोन्ही पायात पैंजण घालून शांत झोपली होती. शेजारच्या खोलीत कापूस भरलेला होता. लालाजीने कापसाला आग लावली आणि प्रेमजीच्या बायकोला ऊंटावर घालून आपल्या घरी आला. म्हातारीला सांगितले, 'ही माझी मुलगी आहे. हिच्यावर लक्ष ठेव. मी थोड्याच दिवसांनी परत येतो.'

उंटावर स्वार होऊन लालजी प्रेमजीच्या घरी परत आला. तेव्हा प्रेमजी दु:खी-कष्टी होऊन बसला होता. त्याच्या भोवती गावातले लोक जमले होते. ते त्याला धीर देत होते. कापसाच्या आगीत प्रेमजीची बायको जळून मेली अशीच त्याची समजूत होती.

लालजी प्रेमजीला म्हणाला, 'काळजी करू नकोस. मला एक मुलगी आहे. तिच्याशी मी तुझे लग्न करून देतो.'

सगळ्या लोकांना बरे वाटले.

काही महिन्यानंतर प्रेमजी लालजीकडे लग्न करण्यासाठी म्हणून गेला. तेथे आपलीच बायको जिवंत असलेली पाहून प्रेमजीला आश्चर्य वाटले. तो खजिल झाला. शरमून गेला. त्याने आपली चूक कबूल केली. लालजीने त्याला त्याची बायको व बरेचसे दागदागिने देऊन निरोप दिला आणि सांगितले 'प्रेमजी बेटा, अजून कच्चा आहेस. चातुर्य कमावले पाहिजेस.'



## ८

# चोरांची फजिती

एका गावात एक शेठाणी रहात होती. तिचे नाव रतनबाई होते. तिच्या माहेरी तिची फक्त म्हातारी आईच होती. बाकी तिला कोणीच नव्हते. एका खेड्यात म्हातारी रहायची. घरची शेतीवाडी बघून कशीतरी जगायची, कधीतरी लेकीला बोलवायची. लेक माहेरपणाला यायची. आई गोडधोड करायची. चार दिवस आनंदात जायचे. आईचे बोलावणे आले की, रतनबाई हातातली कामे टाकून, चार दिवस सवड काढून माहेरी आईकडे जायची. रतनबाईचा नवरा व्यापाराच्या निमित्ताने कधी कधी परदेशी असायचा. अशा वेळी रतनबाईला एकटीलाच माहेरी जावे लागे. त्या काळी आजच्या सारखी वाहतुकीची साधने नव्हती. एकतर बैलगाडीतून जावे लागे, घोड्यावरून जावे लागे. नाहीतर चालत जावे लागे.

तर एकदा रतनबाईला माहेरचा आईकडून निरोप आला. निरोप मिळताच रतनबाईने जाण्याची तयारी केली. तिला एकटीलाच जावे लागणार होते. तिने कपडेलत्ते तर घेतलेच पण अंगावरचे सगळे दागिने काढले आणि एका गाठोड्यात बांधले. ते सामान घेऊन रतनबाई एकटीच माहेरी चालत चालत निघाली.

जाता जाता रस्त्यात तिला एक माणूस भेटला. रतनबाई मोठी हुशार होती. तिने त्या माणसाच्या चालण्या बोलण्यावरून तो चोर आहे हे तात्काळ हेरले आणि खरोखरच तो माणूस चोरच होता. रस्त्याने

येणाऱ्या जाणाऱ्या एकट्या प्रवाशाला गाठून, तो त्यांना लुबाडीत असे. अशी वाटमारी करूनच तो आपली गुजराण करीत असे. चोरी हाच त्याचा धंदा होऊन बसला होता. रतनबाई एकटी दिसताच चोराने तिला गाठले. तो तिच्याशी इकडेच तिकडचे बोलणे काढून तिच्याबरोबर जाऊ लागला. पण रतनबाई वस्ताद होती. तिने ओळखले होते. म्हणून न भिता, न डगमगता त्या चोराला म्हणाली,

'हे बघ मी चालले आहे माहेराला. मी एकटीच आहे. माहेरी आणि सासरी मला कोणीच नाही. दोन्हीकडेही शेतीवाडी आहे. मला जर योग्य माणूस भेटला तर त्याला दत्तक घेणार आहे. आहे का कोणी तुझ्या पाहण्यात असा चांगला माणूस ?'

चोराला वाटले ही तर चांगली संधी आहे. रोज उठून चोरी करण्याचा त्याला कंटाळा आला होता. शिवाय हे वाईट काम किती दिवस करायचे असेही त्याला वाटू लागले होते. या बाईला जर दत्तक गेलो तर दोन घरची धनदौलत हाताशी लागेल. पोटाचा कायमचा प्रश्न सुटेल. आणि असा विचार करून चोर म्हणाला,

'मीच तुम्हाला दत्तक यायला तयार आहे.'

'बरं तर' रतनबाई म्हणाली, आणि चोराच्या डोक्यावर आपल्या जवळचे ओझे दिले. त्याला घेऊन ती आपल्या माहेरी गेली. मनाशी म्हणाली,

'चला रस्त्यावरचे संकट टळले.'

माहेरी पोचल्यावर तिने चोराला जेवू खाऊ घातले. चोर सुस्त होऊन पडला. तेव्हा तिने आपल्या चार विश्वासू लोकांना बोलाविले आणि त्या चोराला पोत्यात घालून विहिरीत टाकून देण्यास सांगितले. त्याप्रमाणे चोराला पोत्यात गुंडाळले. त्यांच्याबरोबर रतनबाईही निघाली.

जाता जाता रस्त्यात आणखी चार चोर तिला दिसले. ते चार चोर एका झाडाच्या आड बसून चोरून आणलेल्या पैशांची व दागिन्यांची वाटणी करीत होते. रतनबाईने ते पाहिले आणि तिला वाटले की, ह्या चोरांनाही अद्दल घडवली पाहिजे. एक बाई चौघांच्या खांद्यावर भले मोठे धन देऊन चालली आहे असे त्यांना वाटले ते पोते पाहून त्यांच्या तोंडाला



पाणी सुटले.

त्यांनी विचार केला की, हे एवढे मोठे धन लुबाडलेच पाहिजे. त्यांनी पुढ्यातला माल तसाच तिथे ठेवला. आणि त्या पोत्याच्या मोगोमाग ते लपतछपत निघाले.

जाता जाता रतनबाई ते पोते घेऊन एका विहिरीजवळ आली. तिथे आल्यावर म्हणाली,

'थांबा कोणी पाहात तर नाही ना? कोणी पाहिलं तर यातला ऐवज काढून घेईल.'

पोते वाहणारे म्हणाले, 'एवढ्या रात्री कोण पाहातय? कोण इथं अंधारात येईल?'

नंतर रतनाबईने ते पोतं विहिरीत टाकण्यात सांगितले. त्याप्रमाणे ते पोते टाकण्यात आले. रतनबाई व ते पोते वाहणारे लोक परत फिरले. हे सर्व त्या चोरांनी लपून पाहिले होते. विहिरीत त्या बाईने धन दडवून ठेवले आहे अशी त्यांची खात्री झाली.

रतनबाईने परतताना त्या चार चोरांनी टाकलेला तो ऐवज गोळा

केला आणि ती घरी परतली. इकडे त्या चार चोरांपैकी एकाने विहिरीत उडी मारली. आणि तळाशी बुडलेले पोते सोडून पाहिले. त्याची निराशा झाली. तो वर येऊन म्हणाला, 'अरे त्यात धन नाही. एक माणूस, तुम्ही येऊ नका.'

परंतु काठावरच्या तिघांना वाटले की हा काही तरी लबाडी करीत आहे. पोत्यातले धन एकट्याने लाटण्याचा याचा विचार दिसतो आहे. दुसऱ्या चोराने पाहिल्यावर विश्वास न ठेवून विहिरीत बुडी मारली. त्यानेही नंतर वर येऊन सांगितले की, 'पोत्यात धन नाही माणूस आहे.'

परंतु काठावरच्या दोघांचा त्याच्यावरही विश्वास बसला नाही. म्हणून त्या दोघांनीही विहिरीत बुडी मारली. त्यांचीही तशीच निराशा झाली. त्यांनी ते पोते वर काढले आणि पाहिले तर त्यातला माणूस म्हणजे त्यांचा एक साथीदार चोरच होता. त्याला त्यांनी शुद्धीवर आणले. आणि त्याच्यासह ते परत त्या झाडाकडे आले. तिथे येऊन पाहतात तर तिथला ऐवज गायब झालेला. चोरांची आणखीनच निराशा झाली. त्या बाईनेच आपल्याला धोका दिला आहे हे ओळखले.

रात्र झाल्यावर ते पाच चोर रनतबाईच्या घराकडे गेले. घरात कोणी जागे नाही ना, याची खात्री करून घेण्यासाठी म्हणून चोर हळूच घराच्या छपरावर चढला. सावध असलेल्या रतनबाईला चोर आल्याची चाहूल लागलीच होती. ते रात्रीचे येतील याची तिने अटकळ बांधलीच होती. ती चाकू घेऊन तयार राहिली-छपरावर चढलेल्या चोराने एका झरोक्यातून खाली वाकून पाहताच, रतनबाईने झटदिशी त्याचे नाकच कापून टाकले त्याबरोबर तो चोर नाक मुठी धरून खाली उतरला. नाक कापल्याचे सांगण्यात त्याला अपमान वाटला, म्हणून छपराचे कौल लागले असे खोटेच सांगितले.

मग दुसरा चोर छपरावर चढला झरोक्यातून त्यानेही खाली वाकून पाहताच रतनबाईने त्याचेही नाक कापले. त्याबरोबर तोही नाक मुठीत धरून खाली उतरला. त्यालाही आपले नाक कापल्याने आपण नकटे झालो हे सांगण्यात अपमान वाटला, म्हणून त्यानेसुद्धा आपल्या नाकाला काहीतरी लागल्याचे खोटेच सांगितले. उरलेल्या तिघांची नाके रतनबाईने

अशाप्रकारे कापून टाकली. नाक कापल्याने नकटे बनलेले ते पाचही चोर रातोरात जंगलात पळून गेले. तेथे बसून त्यांनी रतनबाईला अद्दल घडविण्याचा विचार केला.

एके दिवशी रतनबाई शेणी वेचण्यासाठी गावाबाहेर आली. होती. पाच चोरांनी तिला पाहिले. आता हिचा सूड घ्यावा, म्हणून पाचही जण तिच्यामागे धावले. चोर मागाहून धावत येत आहेत पाहिल्यावर रतनबाईने जवळच्याच वडाच्या पारंब्या दोन्ही हातात पकडल्या व ती झाडावर चढून बसली. झाडाखाली आलेल्या चोरांना वाटले की, आता ही सापडली. झाडावरून कुठे पळणार. ते पाचही जण झाडाखालीच तळ देऊन बसले.

बराच वेळ गेला आणि अंधार पडू लागला. चोरांना बसून बसून झोप येऊ लागली. त्यांनी एकाला जागे रहायला सांगून बाकीचे चौघे जण झोपी गेले. एकटा चोरही बसून बसून पेंगू लागला. रतनबाईने झाडाचे पान तोडून त्याच्या डोक्यावर टाकले. त्याने वर पाहिले तेव्हा रतनबाईने त्याला वर येण्याची खूण केली. तो चोर झाडावर चढला. रतनबाई त्याला म्हणाली, 'मी तुझ्याशी लग्न करीन. तुझी जीभ पाहू बरे.' लग्नाच्या लोभाने त्या चोराने विचार न करता आपली जीभ बाहेर काढली. त्याबरोबर रतनबाईने त्याची जीभही चाकून छाटून टाकली. तो चोर झाडावरून दणकन् खाली आदळला. जीभ छाटल्यामुळे त्याला बोलता ओरडताही येईना. त्याची ही अवस्था पाहून बाकीचे जागे झालेले चार चोर घाबरले आणि पळून गेले.

रतनबाई सावकाश खाली उतरून आपल्या घरी परतली. चोर तिच्या वाटेला पुन्हा गेले नाहीत.



# ६

# वीरसिंह राजाची चतुर राणी

राजस्थानात मांडवगड आहे. तिथल्या एका जुन्या राजाची ही जुनी कहाणी. तर मांडवगडचा राजा वीरसिंह एकदा असाच आपल्या घोड्यावर बसून रपेट करीत होता. राजा बहाद्दर तसा त्याचा घोडाही बहाद्दर ?

दौड मारता मारता घोडा उधळला. चारीदिशांना पळाला. घोड्याचा लगाम खेचून त्याला काबूत आणण्याचा प्रयत्न वीरसिंह राजाने पुष्कळ केला पण बिथरलेला घोडा काही ऐकेना, ताब्यात राहिना.

घोडा तसाच चौखूर दौडत चालला. जाता जाता राजनगरी मागे पडली. नगरीची वेस, तटबंदी ओलांडली पण घोडा थांबण्याचे नाव नाही. पुढे नदी आडवी आली. नदीवर पूल होता. आणखी पुढे लहान लहान वाड्या, खेडी लागली. शेतीभाती रस्त्याच्या दोन्ही कडेला होतीच ती सारी मागे टाकीत घोडा पुढे पुढे धावत होता. घोड्याच्या पाठीवर घट्ट मांड ठोकून वीरसिंह बसला होता. लगाम खेचून घोडा थांबवण्याची पराकाष्ठा करीत होता, पण घोडा आज हवेतच होता !

होता होता घोडा एका घनदाट जंगलात घुसला. जंगलातील झाडाझुडपांतून, वेलीतून, जाळीतून कशाचीही पर्वा न करता घोडा पळत सुटला.

पळता पळता जंगल पार केले. पुढे लागले एक सपाट मैदान. मैदान मोठे प्रशस्त होते. लांब रुंद होते. धावून धावून आता घोडाही

थकला होता. दमला होता. तो एका वडाच्या झाडाखाली सावलीला जाऊन थांबला. राजा त्याच्या पाठीवर तसाच बसलेला होता. घोड्याबरोबर राजाचाही दम उखडलेला होता.

तशाच अवस्थेत तो विश्रांती घेत असता, राजाला काही वेळाने एक दृश्य दिसले. समोरून कोण्या एका राणीची पालखी येत होती. पालखीच्या बरोबर एक हजार हत्यारबंद शिपाई होते. पाचशे पुढे, पाचशे मागे. पालखीवर सोनेरी पडदा लटकत होता. सोनेरी पडद्याला मोत्यांची झालर होती. पालखी वाहणारे भोईसुद्धा भरजरीच्या पोशाखात होते. त्यांच्या हातापायांत सोन्याची कडी दिसत होती. एका हातात चांदीची काठी पण होती. शिवाय ते भोई एकापेक्षा एक रुबाबदार देखणे होते.

हे दृश्य पाहून राजा वीरसिंह चकित झाला! तो पहातच राहिला. त्याच्या मनी विचार आला, जिचा मेणा वाहणारे भोई इतके सुंदर आहेत तर मेण्यात बसलेली राणी किती सुंदर असेल! राणीला पाहण्यासाठी



राजाचे मन उतावीळ बनले. त्याने आपला घोडा हळूच, सावकाशपणाने पालखीच्या मागोमाग चालवला. एवढे होईतोवर पालखीत बसलेल्या देखण्या राजकुमारीने राजाला पाहिले होते, पण राजाने काही तिला पाहिले नव्हते. तो पालखीच्या मागोमाग जात राहिला.

जाता जाता पालखी एका नदीकाठी पोचली. शिपायांनी तिथेच तळ ठोकला. तंबू-राहुट्या उभ्या राहिल्या. राजाही एका झाडाच्या आडोशाने लपून बसला. आता पालखीतली स्त्री बाहेर येईल आणि आपल्या दृष्टीस पडेल, अशा विचारात राजा होता. पण शिपायांनी पालखी पासून तंबूपर्यंत पडदे लावले आणि पडद्याच्या आडूनच राणी तंबूत गेली. राजाची निराशा झाली. आता ती कशी दिसावी ? राजा विचारात पडला. त्याला काही सुचेना. पण तिला पाहिल्याशिवाय परतायचे नाही असे त्याने पक्के ठरवले होते. ती कोणीतरी लावण्यवती राणी, राजकुमारी असावी ह्याची राजाला खात्रीच होती. तो निश्चय करून तेथेच राहिला.

थोड्यावेळाने भोयांनी पालखी उचलली आणि मोठ्या धामधुमीने ते नदीकडे वळले ते आंघोळीसाठी चालले होते. राजकुमारी न्हायला चालली होती. पडद्यातूनच ती नदीपर्यंत गेली. न्हाऊन परत तशीच पालखीत बसली. तळ उठला. पालखी परत निघाली. पाचशे शिपाई पुढे-पाचशे मागे. पालखी चालली. हताश-निराश राजाही पालखीच्या मागोमाग निघाला.

जाता जाता पालखी एका चौरस्त्यावर आली. तिथून राजाची नगरी उजव्या बाजूच्या रस्त्यावर होती. आता काय करावे ? पालखीच्या मागोमाग जावे की नगरीला परतावे ? राजापुढे प्रश्न उभा राहिला. पालखी पाठोपाठ एवढा वेळ घालवून पालखीवालीचे नखसुद्धा दृष्टीस पडले नव्हते. काय करावे ? घरी परतावे की पालखी मागोमाग जावे ?

राजा अशा विचारात असतानाच पालखी डाव्या बाजूच्या रस्त्याला वळली. वळता वळता एक लहानशी पिशवी सारखी पोटली पालखीतून त्याच्याजवळ पडली. त्याच्यासाठीच ती टाकलेली होती. राजाने पटकन घोड्यावरून उडी मारली आणि ती पोटली उचलली. तोवर पालखी लांब गेली होती.

राजाने कुतुहलाने पोटली सोडली. उत्सुकतेने, पाहिले तर त्यात होते एक कमळाचे फूल. फुलाच्या मध्ये ठेवलेली होती एक मोत्याची माळ. माळेच्या मधोमध एक सुपारी व हळकुंड. सुपारीवर कुंकवाचा टिळा लावलेला होता तर हळकुंडावर तांदळाच्या अक्षता चिकटवलेल्या होत्या. राजा बराच वेळ त्यांकडे पाहात राहिला. काय असावा बरं याचा अर्थ ? राजाने पुष्कळ पुष्कळ विचार केला, बरेच डोके खाजवले पण राजाच्या लक्षात काही येईना. राजाला कोडे उमजेना. राजाला काही समजेना. राजाच्या मनात पालखीवालीने मात्र घर केले होते. विचार करत राजा तिन्हीसांजेच्या वेळेला मांडवगडला पोचला.

राजाला सुरक्षित, सुखरूप परतलेला पाहून प्रजेला आनंद झाला. खुषी झाली. कारण दिवसभर राजाचा पत्ता नव्हता. ठावठिकाणा नव्हता. प्रजा काळजीत होती. अस्वस्थ होती. राणीने येऊन राजाचे स्वागत केले. राजा परतलेला पाहून तिला फार आनंद झाला. तिला तर हर्ष झाला होता. दिवसभर ती काळजीने व्यग्र झालेली होती.

राणीने स्वागत केले, प्रजेने जयजयकार केला, पण राजा वीरसिंह चिंतीत दिसत होता. त्याचे मन उदास होते. तो झपझप आपल्या महालात निघून गेला. मंचकावर तळमळत पडून राहिला.

राजाची ही दशा पाहून राणी धावली. तिने राजाची ख्याली खुशाली पुसली. राजाला मनवले, विनवले. पण राजा आपल्याच काळजीत. हसेना, बोलेना, पोटली छातीशी धरून तळमळत पडला होता. पालखीवालीची आठवण काढीत होता. राणीला काय करावे कळेना. तिने त्याची बरीच मनधरणी केली, आर्जवे केली. तेव्हा राजाने ती पोटली खोलली. राणीला विचारले, 'ह्या गोष्टीचा अर्थ काय ?'

राणीने पोटली व पोटलीतल्या वस्तू पाहिल्या. तीही विचारात पडली. काय असावा याचा अर्थ ? राजाची दया येऊन ती म्हणाली, 'राजाजी उठा, थोडे खाऊन घ्या. ह्याचा अर्थ मग सांगेन.'

राजा उठला. थोडे खाल्ले. राणीने विडा लावून दिला. पण राजाने खाल्ला नाही. तो पालखीवालीच्या विचारातच होता ! त्याचे मन त्यातच होते. तो उदास होता.

मग राणीने सांगितले, 'ऐका राजाजी ! पोटलीतल्या कमळाचा अर्थ आहे. पालखीवाली 'पद्मावती नगरीत' राहते. मोत्याच्या माळेचा अर्थ असा आहे की तिचे नाव 'मोतीकुंवर' आहे. सुपारी ही तिच्या घराची खूण आहे. तिच्या घरापुढच्या अंगणात 'सुपारीचे झाड' आहे. हळकुंडाने ती आपला 'गौरवर्ण' सांगते आणि कुंकू-अक्षता यांचा अर्थ असा की ती तुमच्याशी 'मंगल-विवाह' करू इच्छिते.

'अस्सं ?' आनंदाने राजा उद्गारला.

'हो. पण राजाजी, पद्मावती नगरीतच माझे माहेर आहे त्यामुळे मी हिला चांगली ओळखते. मोतीकुंवर म्हणजे साक्षात पद्मिनीचा अवतार आहे. शेठ धरणधरांची ती मुलगी. तिच्या पायगुणानेच शेठजींच्या घरी लक्ष्मीचा वास आहे. तेव्हा शेठजी तिचे लग्न कशासाठी करतील ?' राणी म्हणाली.

'मग कसे होणार ?' राजाने काळजीच्या स्वरात विचारले.

'व्हायचे काय, पद्मावती नगरीला जाऊ. प्रयत्न करू.' राणी हिंमतपूर्वक म्हणाली-तिने राजाला धीर दिला.

दुसरे दिवशी दोघांचे 'जय विजय' नामक घोडे तयार करण्यात आले. दोघे त्यावर स्वार झाले आणि प्रवासाला निघाले. प्रवास बराच दूरचा होता. आठ दिवसांनी दोघे पद्मावती नगरीला पोचले.

पद्मावती येथे राणीचे माहेर होते. तेथल्या राजाची ती मुलगी होती. सर्वजण तिला ओळखत होते. मग उतरायचे कुठे ! राजा एखादे भाड्याचे घर शोधायला निघाला. पण पद्मावती नगरी काही लहानसहान नव्हती. पाच देशांची ती राजधानी होती. घर भाड्याने मिळणे मुष्कील होते. बरीच भटकंती केल्यावर नगरीच्या बाहेर एक पडकेधडके लहानसे घर मिळाले. ते दोघेही तेथे राहू लागले.

दुसऱ्या दिवशी राजाने राणीला विचारले, 'आता काय करायचे ?'

राणी म्हणाली, 'व्यापाऱ्याचा वेष घेऊन धरणीधर शेठजींच्या कोठीवर जा... व्यापाराच्या निमित्ताने सौद्याच्या गोष्टी करा. म्हणा की, एक लक्ष रुपयांचा 'गजमुक्ता' पाहिजे. शेठजीने जर ताबडतोब तो काढून दाखवला तर मान हलवून नापसंत करा. याहूनही चांगला माल दाखवा

असे म्हणा. या सौद्याच्या वेळीच कदाचित मोतीकुंवर दृष्टीस पडेल. शक्यता आहे.'

राणीच्या सांगण्याप्रमाणे राजाने व्यापाऱ्याचा वेष परीधान केला. डोक्यावर पगडी, खांद्यावर शेला, जरीकाठी धोतर आणि हातात छडी. तो सौदागर बनला. फिरत फिरत शेठजींच्या कोठीवर गेला. त्याला पाहताच मोत्यांचा कोणी मोठा व्यापारी आला आहे असेच धरणीधर शेठजीला वाटले. त्यांनी व्यापारी बनलेल्या राजाचा मोठा आदर-सत्कार केला. काय हवे याची नम्रपणाने चौकशी केली.

व्यापारी राजाने सांगितले 'मला एक लाख रूपये किंमतीचा गजमुक्ता हार आणि एक लाख रुपये किंमतीचे असली हिरे हवे आहेत.'

'हा, हा, जरूर.' असे म्हणून शेठजींनी नाना तऱ्हेच्या मौल्यवान हिऱ्यांचे ढीगच्या ढीग राजापुढे घातले. राजाने हिरे पाहिले. एकेका हिऱ्याचे पुष्कळसे गुणवर्णन शेठजींनी केले. पण राजाने ते सर्व हिरे नापसंत ठरवले. म्हणाला, 'याच्याहून चांगले हिरे दाखवा. भारी असले तरी चालतील.' तेव्हा शेठजी दुसरे हिरे आणण्यासाठी दुकानातून आत गेले. तेवढ्यात मोतीकुंवरने एका झरोक्यातून राजाला पाहिले होते; व चटकन ओळखलेही होते. तिने ही संधी साधून पटकन हातात पूजेचे साहित्य घेतले व पूजेच्या बहाण्याने ती बाहेर आली.

ती येताच राजाचे लक्ष तिच्याकडे सहज वेधले. मोतीकुंवरचे स्वर्गीय अप्सरेसारखे अप्रतिम रूपलावण्य पाहून राजा चकित झाला! 'वा' त्याच्या तोंडून नकळत शब्द उमटला नि तो पहातच राहिला.

राजाही काही कमी देखणा नव्हता. तोही रुबाबदार सुदृढ, राजबिंडा पुरुष होता. मोतीकुंवर नाजूक चमेलीच्या फुलासारखी होती, तर राजा डौलदार गुलाबाच्या फुलासारखा होता. मोतीकुंवर चांदण्यांसारखी होती तर राजा पौर्णिमेच्या चंद्रासारखा प्रसन्न, सुंदर होता. मोतीकुंवर दीपज्योतीसारखी होती तर राजा सूर्यासारखा तेजस्वी होता! राजाच्या सौंदर्याप्रमाणेच त्याचे शौर्य व साहस देखील त्याच्या चमकदार नजरेतून लक्षात येत होते. मोतीकुंवर देखील लुब्ध होऊन क्षणभर थबकली. दोघांची नजरभेट झाली. मध्यरात्री गावाबाहेरच्या सतीमातेच्या देवळात भेटण्याचे ठरले. मोतीकुंवर

निघून गेली.

थोड्या वेळाने शेठजी येऊन म्हणाले, 'माफ करा, रावसाहेब! भारी हिरे सध्या जवळ नाहीत. आठ-पंधरा दिवसांत मागवून देतो.'

'ठीक आहे' असे म्हणून राजा उठला. आपल्या बिऱ्हाडी परतला. घडलेली राणीला सांगितली.

संध्याकाळ झाली. राजाला मध्यरात्र केव्हा होते असे झाले होते. एक एक क्षण त्याला एक एक युगासारखा भासू लागला. एवढा तो उतावीळ बनला होता.

अखेरीस मध्यरात्रीचा समय झाला. राजवाड्याच्या नगारखान्यात नगाऱ्यावर टिपरू पडले. राणीने आधीच राजाला वस्त्रालंकारांनी नटवून सजवून ठेवले होते. 'धिडधांग' असा आवाज करीत जेव्हा नगारा वाजू लागला तेव्हा राणी राजाला घेऊन गावाबाहेरच्या सतीमातेच्या मंदिरात गेली व तिथे त्याला सोडून परतली. मोतीकुंवरही नटून सजून सावधपणाने घर सोडून मध्यरात्री निघालीं व ठरल्याप्रमाणे राजाच्या भेटीसाठी सतीमातेच्या मंदिरात आली. येताना कोणाच्या दृष्टीस पडू नये याची तिने पुष्कळच खबरदारी घेतली होती. पण अंधेऱ्या रात्रीदेखील तिच्या हालचालींवरून नगरीच्या कोतवालाने व पहारेकऱ्यांनी तिला हेरले. ते तिच्या पाठोपाठ लपत छपत सतीमातेच्या मंदिरापर्यंत गेले. त्यांनी मोतीकुंवरला ओळखले आणि आश्चर्यचकीत झाले.

मोतीकुंवर मंदिरात गेली, इकडे तिकडे पाहून, कोणी नाही याची खात्री करून तिने मंदिराचा मुख्य दरवाजा बंद करून घेतला.

परंतु हे सर्व लपून पहात असलेल्या पहारेकऱ्यांनी न्याहाळले होते. मोतीकुंवरने दरवाजा लावून घेतानाच पुढे आलेल्या राजाच्या डोक्यावरची भरजरी पगडीही त्यांना दिसली होती. आत कोणी पुरुष आहे हे त्यांनी ताडले आणि झपझप त्यांनी ही गोष्ट राजाच्या कानी घातली. पद्मावती नगरीचा राजाही वार्ता ऐकून थक्क झाला. म्हणाला 'शेठजींची मुलगी मोतीकुंवर म्हणजे शालिनता व सौंदर्य याची खाण आहे. ती अशा वेळी सतीमातेच्या मंदिरात जाईल कशी?'

'पण महाराज, आम्ही आमच्या प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली तिला.'

'खात्री आहे तुमची ?'

'होय महाराज, पूर्ण खात्री आहे. तीच होती ती.' कोतवालाने सांगितले.

राजा म्हणाला, 'असं ! आणखी शिपाई घ्या, आणि ताबडतोब मंदिराभोवती वेढा बसवा. मंदिरातून कोणालाही बाहेर जाऊ नका ! सकाळी मी येऊन पहातो.'

राजाच्या आज्ञेप्रमाणे कोतवालाने सतीमातेच्या मंदिराभोवती वेढा टाकला.

बाहेरच्या हालचालींची चाहूल मंदिरात मोतीकुंवरला लागली. तिने एका झरोक्यातून बाहेर डोकावून पाहिले, तर मंदिराला शिपायांनी वेढा दिल्याचे तिला दिसले. ती घाबरली ! राजाही भ्याला ! आता काय करायचे ? कसे निसटायचे ? दोघांच्याही पुढे प्रश्न उभा राहिला.

राजा म्हणाला, 'माझी राणी बाहेर बिऱ्हाडी आहे तिला कळले तर ती सुटका करील. ती फार चतुर आहे. धोरणी आहे.'

मोती कुंवर म्हणाली, 'ते ठीक आहे. पण राणीला तरी कसे कळवायचे ?'

ती विचार करू लागली. शेवटी तिला एक उपाय सुचला. ती उठली. मंदिराच्या मागील दारी गेली. हळूच दार उघडले, तेथल्या चार पहारेकऱ्यांना खूण केली. ते येताच त्यांच्या हातात मोहोरांची थैली दिली. म्हणाली, 'एक काम कराल ?'

थैलीच्या लोभाने पहारेकरी पाघळले, 'का नाही करणार ?' मग मोतीकुंवरने त्यांना राणीच्या बिऱ्हाडाची खूण सांगितली. म्हणाली, 'त्या तिथे जा. त्या पडक्या घरावर चार-आठ दगड टाका नि म्हणा 'जर कोणाचा हत्ती, घोडा, उंट बाहेर सुटून गेला असेल तर रातोरात धरून बांधा. नाहीतर सकाळी हाती लागणार नाही. एवढे काम कराल तर आणखी मोहरा देईन.'

पहारेकऱ्यांच्या तोंडाला पाणी सुटले. दोघेजण गेले. सांगितल्याप्रमाणे केले. राणी जागीच होती. तिने घरावर दगड पडल्याचा आवाज ऐकला तशी सावध होऊन दाराशी आली. पाठोपाठ ती घोषणाही कानी आली.

राणी मनी उमगली. राजा संकटात आहे हे ती समजली. तिने पटकन पुढे होऊन पहारेकऱ्याला काही मोहरा दिल्या, काय परिस्थिती आहे याचा अंदाज घेतला. मग ती पुढच्या तयारीला लागली.

राणीने एका हातात पूजा-साहित्य आणि दुसऱ्या हातात लाडूंची थाळी घेतली. त्या लाडूत गुंगी आणणारी भांग मिसळली होती. राणी अंधारातून झपझप सतीमातेच्या मंदिराकडे निघाली.

मंदिराच्या दरवाज्याजवळ येताच तिला कोतवालाने अडवले. त्यावर राणीने त्यालाच दटावले आणि म्हटले,

'मला अडवणार तू कोण आहेस ! मी नगरशेठाची नात आहे. मला ओळखत नाहीस. सतीमातेच्या पूजेचे मी व्रत घेतलेले आहे. रोज रात्री मंदिरात येऊन मी पूजा करीत असते. मला मंदिरात जाऊ दिले नाहीस तर मी शेठजीना उठवीन. ते राजाच्या कानी ही गोष्ट घालतील तक्रार करतील.'

नगर शेठजींची आणि राजाची मैत्री कोतवाल जाणून होता. राजा शेठजींना किती मानत होता हे ही तो जाणत होता, तेव्हा त्याने विचार केला की, या बाईला अडवले तर आफत येईल. शिवाय राजाने मंदिरातून कोणाला बाहेर सोडू नकोस अशी आज्ञा दिली आहे, तेव्हा या बाईला मंदिरात जाऊन द्यायला काहीच हरकत नाही. तिला सतीमातेची पूजा करायला कशासाठी बंदी करायची. तिचे व्रत आपण कशासाठी मोडायचे. कोतवालाने राणीला मंदिरात जाऊ दिले. थाळीतील लाडू पाहून मंदिराच्या दारातील पहारेकऱ्यांच्या तोंडाला पाणी सुटले होते. राणी आत चालली तेव्हा ते म्हणाले,

'बाईजी, पूजा झाल्यावर प्रसाद वाटायला विसरू नका.'

राणी म्हणाली, 'नंतरचे कोणी पाहिले आहे ? घ्या. आताच खा.'

पहारेकऱ्यांना काही लाडू देऊन राणीने दरवाजावर थाप मारली. ही थाप राणीचीच आहे हे मोतीकुंवरने ओळखले. तिने दरवाजा उघडला. आत गेल्यावर राणीने झटपट आपले कपडे मोतीकुंवरला दिले. राणीचे कपडे घालून व थाळी घेऊन थोड्या वेळाने मोतीकुंवर बाहेर गुपचूप निघून गेली, त्यावेळी लाडू खाऊन पहारेकरी बेशुद्ध होऊन पडले होते. मोतीकुंवर

गुपचूप निघून गेली.

सकाळ झाली तशी राजा मंदिराच्या पुढे आला. त्याच्याबरोबर त्याचे प्रधान, सरदार, सेनापती, राजगुरू इत्यादी सर्वजण होते. ज्यांना ज्यांना ही वार्ता कळली होती, ते ते पुष्कळसे लोकही तेथे जमा झालें होते. राजाच्या आज्ञेवरून कोतवालाने मंदिराचा दरवाजा उघडला. राजा मंदिरात गेला. पाहतो तो देवीपुढे तुपाचा दिवा जळत असून त्याची मुलगी दिव्यात तूप घालीत आहे व जावई देवीपुढे बसून जप करीत आहे असे दृश्य त्याला दिसले. राजा आश्चर्यचकित झाला तो एकदम उद्गारला,

'मुली तू इथं कशी ?'

राणी म्हणाली, 'बाबा, एका ज्योतिषाने परवा सांगितले की, तुझ्या सौभाग्याला धोका आहे. हे संकट टाळण्यासाठी देवीचे व्रत कर आणि पूजा कर. व्रत पुरे करून देवीचीं पूजा करण्यासाठी काल मी येथे आले आहे'

असे म्हणून तिने आपल्या वडिलांच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला. राजानेही जप संपवून आपल्या सासऱ्याला वंदन केले. दोघांना पाहून राजाला आनंद झाला मग मोठ्या थाटामाटाने त्या दोघांना राजवाड्यात आणले. चार दिवस प्रेमाने ठेवून घेतले आणि नंतर पुष्कळसे धनद्रव्य, आणि रथ, पालखी देऊन त्यांना निरोप दिला.

नगराच्या बाहेर गेल्यावर राणीने ते सगळे सेवकांच्या बरोबर आपल्या नगरीला धाडून दिले, आणि राजाला घेऊन ती परत आपल्या बिऱ्हाडी आली.

तिकडे राजाने कोतवालाला बोलावून म्हटले, 'मोतीकुंवरचे नाव तू उगाच बदनाम केलेस. तू माझ्यांशी खोटे बोललास. ह्या अपराधाबद्दल तुला फाशीची शिक्षा देण्यात येईल.'

खाली मान घालून कोतवाल उभा होता. तो म्हणाला,

'महाराज ! मी माझ्या डोळ्यांनी पाहिले तेच तुम्हाला सांगितले. मोतीकुंवरला बोलवा. सतीमातेचा प्रताप खोटा होणार नाही. तिने मातेच्या पायावर हात ठेवून रात्री मी मंदिरात नव्हते असे सांगावे, मी फाशी जायला तयार आहे.'

त्या नगरीत सतीमातेचा प्रताप सर्वांना ठाऊक होता. सतीमातेपुढे खोटे बोलणे म्हणजे आपला मृत्यू ओढवून घेण्यासारखे होते. जो कोणी मातेपुढे खोटे बोलत असे, तो तिथल्या तिथेच मृत्यू पावत असे.

मोतीकुंवरला बोलावून तिला देवीपुढे खरे बोलण्यास सांगितले.तिला परीक्षा देण्यास सांगितले, तेव्हा ती तयार झाली, परंतु ती मनातून फारच घाबरली गेली होती. देवीपुढे खोटे बोलण्याची हिम्मत तिला नव्हती.

परीक्षेसाठी एकादशीचा दिवस निश्चित करण्यात आला. आदल्या रात्री घाबरलेली मोतीकुंवर राणीच्या बिऱ्हाडी गेली. राणीने तिला धीर दिला आणि तिच्या कानात काही तरी सांगितले. ते ऐकून मोतीकुंवर रातोरात घरी परतली.

एकादशीच्या दिवशी सतीमातेच्या मंदिरापुढे सारा गाव जमा झाला होता राजाही ठरलेल्या वेळी तेथे हजर झाला. पाठोपाठ मोतीकुंवरची पालखी आली. पालखीतून मोतीकुंवर खाली उतरताच एक बैरागी 'अल्लख निरंजन' असे म्हणत व हातातील चिमटा वाजवत पुढे आला. मोतीकुंवरने त्याच्या पायला स्पर्श करून नमस्कार केला. बैराग्याने तिला आशीर्वाद दिला. तिच्या कपाळी अंगारा लावला आणि 'अल्लखन निरंजन' म्हणत व चिमटा वाजवीत निघून गेला.

तो बैरागी म्हणजे राजा वीरसिंहच होता. मोतीकुंवर मंदिरात गेली. देवीच्या चरणावर हात ठेवून म्हणाली,

'हे माते ! तुझ्यापासून काय लपवू ? तुला सर्व काही ठाऊकच आहे. तू सर्व काही जाणतेस. या बैराग्याशिवाय आजवर अन्य परपुरुषाला मी स्पर्श केला असेन तर तुझ्या पुढील ह्या दिव्यातील ज्योतीने जळून भस्म होईल.'

असे म्हणून तिने दिव्यावर हात धरला पण तो जळला नाही. मोतीकुंवरने परीक्षा दिली होती व ती त्यात उत्तीर्ण झाली होती.

बिचारा कोतवाल ! तो हरला होता. त्याने राजपुढे आपली मान झुकवली पण मोतीकुंवर राजाला म्हणाली,

'महाराज ! आपण मला माझ्या पित्यासारखे आहात आपल्यापुढे मी परीक्षा दिली. मी सफल झाले. पण माझ्यामुळे ह्या कोतवालाचा जीव

जावा हे बरोबर नाही. त्याच्यावर दया करा आणि त्याला सोडून द्या अशी मी आपल्या चरणाशी विनंती करते.'

राजाने मोतीकुंवरची विनंती मान्य करून कोतवालाची शिक्षा रद्द केली व त्याला सोडून दिले. नंतर लोक आपआपल्या घरी परतले.

मोतीकुंवर वरचे संकट टळले हे खरे पण तिचा आणि वीरसिंहाचा विवाह कसा व्हावा ? राणीने यावरही उपाय शोधून काढला. ती आपल्या नगरीला परत आली एक मोठी फौज घेऊन पद्मावतीला परतली. राणीने स्वत: सेनापतीचा वेश घेतला आणि राजाला एका सुंदर स्त्रीचा वेश दिला. मग अशा थाटातच ती धरणीधर शेटजींकडे आली व म्हणाली,

'शेठजी, मी दक्षिणेकडे लढाईला जात आहे. माझ्याकडे माझी पत्नी आहे. तिला यापुढे घेऊन जाणे योग्य नाही. मी परत येईपर्यंत तुम्ही हिला आपल्याकडे ठेवून घ्या.'

एवढी मोठी फौज असलेल्या सेनापतीचे हे म्हणणे धरणीधर शेठजीला ऐकण भागच होते. त्याने संमती दिली. सेनापतीच्या राणीची पालखी शेठजींच्या घरात गेली. मोतीकुंवरला हे सगळे समजले होते. तिने ती पालखी आपल्या दालनात ठेवून घेतली. नंतर वीरसिंह राजा तेथेच मजेत राहू लागला.

मोतीकुंवरला एक मोठी बहिण होती. ती बरेच दिवस माहेरी आलेली होती. एके दिवशी तिचा पती तिला नेण्यासाठी आला. ते मोतीकुंवरच्या समोरच्या दालनातच उतरले होते. एके दिवशी सहजच त्याच्या दृष्टीस मोतीकुंवरचा एक हात पडला. तो सुंदर हात पाहून वाटले की, आपल्या पत्नीपेक्षा मोतीकुंवर अधिक सुंदर आहे. त्या दिवशी चोरून मोतीकुंवरला पाहण्यासाठी तो तिच्या महालात शिरला. तेथे त्याला एक पुरुष दिसताच तो चमकला व परत जाऊ लागला. वीरसिंह राजा जागाच होता तो झटकन उठला आणि त्याने त्याचे नाक कापले.

नाक कापले गेल्यावर मोतीकुंवरचा मेव्हणा तशा अवस्थेत तेथे थोडाच रहाणार ? तो रातोरात तेथून पसार झाला. राजा वीरसिंहसुद्धा दोरीच्या सहाय्याने मोतीकुंवरच्या महालाच्या खिडकीतून बाहेर उतरून गेला. गेला तो सरळ आपल्या बिऱ्हाडी राणीला भेटला. घडलेली

हकीकत राणीला सांगितली. ती ऐकून ती म्हणाली, 'हे छानच झाले. आता मोतीकुंवर आपल्या हाती आलीच म्हणून समजा.'

सकाळ झाली तशी शेठजींच्या वाड्यात खळबळ माजली. रातोरात जावई गायब आणि सेनापतीची बायकोही गायब ! सगळ्यांनी एकच तर्क केला की, जावईबुवांनीच त्या स्त्रीला पळवून नेली. धरणीधर शेठजी तर चिंताग्रस्त झाले. सेनापती आल्यावर आता त्याला काय सांगायचे, असा प्रश्न त्यांच्यापुढे होता. त्यांनी दाही दिशांना दोघांचा शोध घेण्यासाठी माणसे धाडली. माणसांनी त्या दोघांचा खूप शोध केला, पण दोघांचाही पत्ता लागला नाही.

चार दिवसानंतर राणी सेनापतीच्या वेशात धरणीधर शेठजीकडे आली व म्हणाली,

'शेठजी, आपल्या सहकार्याबद्दल आभार. माझ्या पत्नीला मी आता घेऊन जातो. तिला बोलवा.'

हे ऐकताच धरणीधर शेठजीचे धाबे दणाणले. त्यांची छाती धडधडू लागली. मान खाली झुकली. तोंडून शब्द फुटेना, तेव्हा मग शेठजींच्या मुनीमानेच सर्व हकीकत सांगितली. ती ऐकताच सेनापती राणीने रागाने आपली तलवार उपसली आणि ती गरजली,

'माझी पत्नी ताबडतोब माझ्या ताब्यात द्या. नाहीतर सर्वांचीच कत्तल करून टाकतो.'

सेनापतीची धमकी ऐकून शेठजींची वाचा बंद झाली. डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. त्यांनी आपल्या डोक्यावरची पगडी काढून सेनापतीच्या पायावर ठेवली व माफी मागितली. पण सेनापती थोडेच ऐकणार ?

शेठजींचा मुनीम हा हुशार माणूस होता. तो म्हणाला की, सेनापतीच्या पत्नीच्या बदल्यात शेठजींच्या मुलीशी सेनापतीने लग्न करावे. शेठजींनीही याला नाइलाजाने संमती दिली.

सेनापतीने आधी बरेच आढेवेढे घेतले व शेवटी संमती दिली.

नंतर लवकरच एका मुहूर्तावर मोतीकुंवरचे सेनापतीशी लग्न लावण्यात आले. लग्नानंतर बरीचशी धनदौलत देऊन शेठजीने त्या दोघांना निरोप

दिला.

सेनापती राणी मोतीकुंवरला घेऊन निघाली. मध्येच गुपचूप जाऊन तिने आपल्या बिऱ्हाडीच्या वीरसिंह राजाला बरोबर घेतले आणि सर्वजण मांडवगडकडे निघाले. मांडवगडच्या सीमेवर येताच राणीने आपला सेनापतीचा वेष बदलला व ती राणी झाली व वीरसिंह राजा झाला.

मांडवगडला आल्यावर मोतीकुंवर वीरसिंह राजाची राणी झाली. तिघेही आनंदाने राहिली.

## ७

# बारा भाऊ, एक बहीण

अशीच एक जुनी गोष्ट. जुन्या काळची. जुन्या राजा-राणीची. तर एक होता राजा नि एक होती राणी. दोघेही आनंदी. त्यांचं राज्य मोठं. त्याचं वैभव मोठं. त्यांना मुलंही होती. बारा. सगळे मुलगेच.

एके दिवशी काय झालं, राजा राणीला म्हणाला, 'जर आता तेरावी मुलगी जन्माला आली तर मी पहिल्या बाराही मुलांना ठार मारून टाकीन. मग माझं हे साम्राज्य, हे धन, हे वैभव या सर्वांची मालकीण एकटी ती मुलगीच होईल !'

राजा तर बोलून गेला. पण राणी मात्र मनच्यामनी चरकून गेली. तिला आति दु:ख झाले. वाईट वाटले.

आई अशी दु:खीकष्टी बनलेली पाहून सगळ्यांत धाकट्या मुलाने तिला विचारले, 'आई, आई ! एवढी का ग दु:खीकष्टी ?'

'बाळा माझ्या, कशा रे सांगू मनच्या गोष्टी !' राणी म्हणाली.

'सांग ग सांग, जशी असेल तशी सांग.'

धाकट्या बेंजामिनने हट्टच धरला. राणीचा नाइलाज झाला.

तिनं राजाचं बोलणं धाकट्याच्या कानावर घातलं नि म्हणाली, 'म्हणून मी रडत्येय बाळा.'

'आई-आई, तू मुळीच रडू नकोस. दु:ख करू नकोस. आम्ही बारा भाऊ आमचा जीव वाचवू.' धाकटा म्हणाला.

'खरं रे लाडक्या; तसंच कर, आपल्या भावांचा सांभाळ कर.' आई म्हणाली, 'तुझ्या अकराही भावांना घेऊन दूर दूर कुठं तरी जंगलात जा.' 'जंगलात जाऊन काय करू, आई ?' धाकट्यानं विचारलं. तशी आईनं सांगितलं, 'जंगलात राहा, उंच झाडं पहा-'

'हं.'

'एक जण चढा, शेंड्यावर बसा.'

'बरं.'

'तिथून दिसेल नगरीतला किल्ला. किल्लावरचा नगरखाना; नगरखान्यावरचा ध्वजस्तंभ.'

'हं.'

'या ध्वजस्तंभाकडं रोज पाहात चला; नीट, निरखून.'

'कशासाठी, आई ?'

'तुम्हांला जर भाऊच झाला तेरावा तर ध्वजस्तंभावर पांढरं निशाण फडफडेल. मग तुम्हाला कसली भीती नाही. तुम्ही सगळे परत या. पण जर तुम्हाला बहीण झाली तर ध्वजस्तंभावर लाल निशाण चढवलं जाईल. लाल निशाण दिसलं तर लगबग करा आणि आणखी दूर पळा. दूर... दूर... दूर जा. देव तुमचं कल्याण करो !' आईने भरलेल्या डोळ्यांनी आशीर्वाद दिला.

दुसरे दिवशी भल्या पहाटेच बारा भाऊ उठले आणि नगरीबाहेर पडले. जंगलाकडे निघाले. जाता जाता एका दाट जंगलात ते पोचले. दोघातिघांनी आडोसा पाहून तिथं एक खोपटं उभारलं. झाड-पाल्यांनी शाकारलं. निवाऱ्याला जागा केली. दुसऱ्या चार जणांनी फळझाडं शोधली. फळ तोडून आणली. भुकेची व्यवस्था झाली. शेजारच्या झऱ्यावरून दोघांनी पाणी आणलं. धाकट्यानं उंच उंच झाड शोधलं. ते झाड होतं ओकाचं. खूप खूप उंच. तो सरसर चढायचा. शेंड्यावर जाऊन बसायचा. तिथून नगरीतला किल्ला दिसे, किल्ल्यावरचा नगरारखाना दिसे, नगारखान्यावरचा ध्वजस्तंभ दिसे. तो रोज पाहायचा. ध्वजस्तंभ न्याहाळायचा. त्याच्या मागून दुसरा, मग तिसरा अशी पाळी असे.

एकामागून एक असे अकरा दिवस गेले. बाराव्या दिवशी त्या वेळी

पाळी होती बेंजामिनची. बेंजामिनने पाहिले तो ध्वजस्तंभावर लाल निशाण चढलेले. वाऱ्यावर फडफडते आहे. बारा राजकुमारांची जणू मृत्यू-पताकाच !

बेंजामिन सरसर खाली उतरला. आपल्या भावांना गोळा करून म्हणाला, 'गड्यांनो, नको तेच घडलं आहे; किल्ल्यावरच्या स्तंभावर लाल निशाण चढलं आहे.'

'याचा अर्थ आपले दिवस भरले.' जॉन हताशपणे म्हणाला.

'पण कशासाठी आपण मरायचं ? ड्यूक संतापून बोलला, 'एका पोरटीच्या पायात आम्ही आमचा जीव गमवायचा ? भलतंच काही तरी. आपण याचा सूड घेतला पाहिजे. ती पोरटी जिथं कुठं दिसेल तिथं तिला ठेचली पाहिजे.' ड्यूकचं म्हणणं जवळ जवळ सगळ्यांनाच पटलं आणि ते जीव वाचवण्याच्या उद्देनाने, आईने सांगितल्याप्रमाणे, आणखी दूरवरच्या जंगलात, लांब लांब निघून गेले.

दिवस, महिने आणि वर्षामागून वर्षेही अशीच निघून गेली. एक का दोन ? तब्बल दहा वर्षे उलटली.

राजकन्या दहा वर्षांची झाली. सुंदर, सुरेख तशीच दयाळू, प्रेमळ. ती छान छान पोशाख करायची. डोक्यावरच्या केसांतून सोन्याची चांदणी कपाळावर माळायची. हसायची. खेळायची. सगळ्यांना सुखवायची.

एके दिवशी काय झालं. पुष्कळसे जुने कपडे दासीनं काढले. राणीने पाहिले. धुवायला धाडले.

पाहता पाहता राजकन्येला दिसले बारा सदरे. इटुकले इटुकले. तिला मज्जा वाटली. ती राणीला म्हणाली, 'आई, आई, हे सदरे ग कुणाचे ? एवढे इटुकले का बाबांचे ?'

राणी आपली गप्प बसली.

पण राजकन्या कुठली बसायला, ती राणीच्या पाठीसच लागली, 'सांग ना ग आई, सांग- कुणाचे हे सदरे ?'

'आहेत तुझ्या भावांचे.' राणी बोलून गेली. डोळे भरून आले.

'माझ्या भावांचे ? मला भाऊ आहेत, आई ?'

'एक का दोन, बारा जण आहेत.'

'बारा जण आहेत !' राज्यकन्येला आश्चर्य वाटलं. आनंदही झाला. आईला म्हणाली,

'कुठायत् ग मग ?'

'देवाला ठाऊक.' डोळ्यांच्या कडा पुसत राणी म्हणाली. 'असतील हिंडत पृथ्वीच्या पाठीवर. कुठं तरी, कसे तरी.'

राणीला मुलांच्या आठवणीने खूप दुःख झाले. आपल्या मुलीला सगळी हकिकत राणीने सांगितली- आणि ती रडू लागली.

'रडू नकोस आई तू.' राजकन्या म्हणाली, 'मी जाते जंगलात आणि आणते माझ्या भावांना शोधून.'

आणि ते इटुकले बारा सदरे बरोबर घेऊन राजकन्या खरंच जंगलाकडे निघाली. हिंड हिंड हिंडली. जंगलाची वाट तुडवली. सकाळ गेली, दुपार गेली, रात्री झाडाखाली झोपली.

दुसरे दिवशी पुन्हा तेच. तिसरे दिवशी पुन्हा तेच....

मग अखेरीस तिला जंगलात एक खोपटं दिसलं. खोपटात बेंजामिन होता. त्यानं तिला विचारले,

'कोण ग तू ? कोठून आलीस ? कशाला आलीस ?'

'मी आहे राजकन्या. चालले आहे भावांना शोधायला. बारा भाऊ आहेत मला. हे पाहिलेस त्यांचे सदरे ?' असे म्हणून राज्यकन्येने त्याला इटुकले बारा सदरे दाखवले.

'अरे, म्हणजे तू आमची बहीणच की ?' बेंजामीन आश्चर्याने उद्‌गारला. म्हणाला, 'मीच तुझा धाकटा भाऊ बेंजामीन.'

भावा-बहिणीची अशी अचानक गाठ पडली. बेंजामिनला आनंद झाला. दोघेही हसू-नाचू लागले. आनंदाने बागडले.

मग एकदम बेंजामिनला आपल्या प्रतिज्ञेची आठवण झाली. तो म्हणाला, 'ताई अग आम्ही त्या वेळी इथं जंगलात येताना एक प्रतिज्ञा केली होती.'

'कसली रे भाऊ ?' राजकन्येनं विचारलं.

'भेटेन त्या मुलीला ठार मारायची.'

'कशासाठी पण ?'

'तिच्यामुळंच ना आम्ही प्राणाला मुकणार होतो. तिच्यामुळंच ना आम्हाला जंगलात यावं लागलं.'

'खरं रे खरं, भाऊ! मग माझे बारा भाऊ जर सुखानं जगणार असतील तर मी त्यांच्यासाठी आनंदानं मरायला तयार आहे.' राजकन्या शांतपणानं म्हणाली.

बेंजामिनला काय करावं कळेच ना. त्याला आपली बहीण खूप खूप आवडली होती. ती खूप खूप चांगली होती. मग तिला का मारायचं? ठार करायचं?'

बेंजामिनचं हृदय कळवळलं. तो बहिणीला म्हणाला, 'छे, छे! असं होणार नाही. ताई, मी तुलाही वाचवीन. थोडा वेळ ह्या टोपलीखाली बैस. आपले अकरा भाऊ एवढ्यातच येतील.'

राजकन्या टोपलीखाली बसली. हळूहळू संध्याकाळ झाली. एकेक भाऊ परतू लागला. सगळेजण आल्यावर कोंडाळं करून बसले. आणलेली फळं खायला लागले. गप्पागोष्टी करू लागले. मध्येच ड्यूकने विचारले,

'आजची काही विशेष खबर?'

'आहे तर!' बेंजामिन म्हणाला. सारे जण उत्सुक झाले. त्याच्याकडे पाहू लागले. जॉन म्हणाला, 'साग तर खरी.'

'सांगतो' बेंजामिन म्हणाला, 'पण त्याआधी मला एक वचन द्या!'

'कसलं वचन मागतोस?'

'भेटेल त्या पहिल्या मुलीला आपण ठार मारणार नाही असं.'

'एवढंच ठीक आहे. बेंजामिन, दिलं आम्ही वचन. काय रे बाबांनो?' जॉन म्हणाला. साऱ्यांनी संमती दिली.

'हं. सांग बरं आता.' ड्यूक अधीर होऊन म्हणाला.

'अरे, आपली ताई आली आहे इथं.' बेंजामिन म्हणाला आणि त्याने उठून टोपली दूर केली. तशी ती देखणी राजकन्या छान छान कपडे घातलेली, कपाळावर सोन्याची चांदणी सोडलेली, त्यांच्या पुढ्यात येऊन उभी राहिली. तिला पाहताच त्या भावांना इतका आनंद झाला की कुणी तिचे प्रेमभराने मुके घेऊ लागले. कुणी तिला 'ताई' म्हणून मिठी मारली. कुणी गाणे म्हणून लागला, तर कुणी नाचूही लागला. राजकन्या आपल्या

भावांबरोबर त्या झोपडीत राहिली. त्यांना मदत करू लागली.

एकदा काय झालं, झोपडीच्या जवळच हिंडत असता तिच्या दृष्टीला एक छोटीशी बाग दिसली. बागेत पांढऱ्या गुलाबाची बारा फुलं डौलानं डौलत होती. ती पाहताच राजकन्येला वाटलं, 'किती छान आहेत ही फुलं आपल्या भावांच्या कोटांवर लावली तर किती खुलून दिसतील नाही ?'

आणि राजकन्येनं पुढं होऊन ती फुलं तोडली. ती बारा फुलं तिनं तोडली मात्र, इकडे झोपडीतल्या बारा भावांची कबुतरं बनली आणि आभाळात ती उडून गेली! झोपडीही अदृश्य झाली! कारण ती फुलं चेटकिणीने भारलेली होती.

राजकन्या भेदरून गेली. ती इकडे तिकडे पाहू लागली, तशी तिला एक जख्खड म्हातारी तिला म्हणाली,

'मुली, कशाला बरं ती बारा फुलं तोडलीस ? ती फुलं म्हणजे तुझे



भाऊ होते. आता त्यांची कबुतरं झाली.'

'आजीबाई, काय करू हो, मला ठाऊक नव्हतं' राजकन्या रडू लागली. तिला अपार दुःख झालं. गालावरचे अश्रूंचे ओघळ पुरत तिनं म्हातारीला विचारलं, 'काय करू म्हणजे माझे भाऊ मला परत मिळतील आजीबाई ?'

'मुली, फक्त एकच मार्ग आहे त्याशिवाय काहीच उपाय नाही.' म्हातारी म्हतारी म्हणाली.

'सांगा, सांगा आजीबाई, कोणता तो मार्ग ?' राजकन्येनं अधीर होऊन विचारलं.

'मुली, कठीण आहे ते.'

'असू द्या, आजीबाई; मी वाटेल ते करीन माझ्या भावांसाठी.'

'मग ऐक. तुला त्यांच्यासाठी सात वर्ष मुकं होऊन राहावं लागेल बोलायचं नाही की हसायचं नाही. एक जरी अक्षर उच्चारलंस तरी तुझे भाऊ मरून जातील.' म्हातारी म्हणाली.

'राहीन मी मुकी होऊन. नाही बोलायची शब्दसुद्धा.' राजकन्या निर्वाणीनं म्हणाली. जंगलातल्या एका उंच झाडावर जाऊन बसली.

दिवसांमागून दिवस गेले. एके दिवशी एक राजपुत्र शिकारीसाठी जंगलात आला. हिंडता हिंडता त्याच झाडाखाली सुंदर, सुरेख राजकन्या पाहून त्याला फार आनंद झाला. राजपुत्राने अशी देखणी मुलगी अद्याप पाहिलेली नव्हती. तो मोहून गेला. त्याने तिला लग्नाची मागणी घातली. पण राजकन्या काहीच बोलली नाही, फक्त तिनं हलकेच मान हलवली.

मग राजपुत्र झाडावर चढला आणि त्यानं राजकन्येला खाली उतरवलं; आपल्या घोड्यावर बसवलं आणि सरळ घरी आणलं. थोड्याच दिवसात दोघांचं लग्न झालं. मोठ्या थाटामाटाने, धामधुमीत. पण राजकन्या मात्र गप्प, गप्प. बोलणं नाही की हसणं नाही. वर्षामागून वर्ष गेली. राजपत्र आणि राजकन्या सुखानं आनंदानं राहात होती. राजकन्येचं मौन मात्र सुरूच होतं. पण त्यांचं सुखी जीवन राजपुत्राच्या दुष्ट स्वभावाच्या आईला पाहवेना. ती राजकन्येचा द्वेष करू लागली. एके दिवशी राजपुत्राला ती म्हणाली,

'मला खात्री आहे बाळ, तू ही एक अडाणी, भिकारीण घेऊन आला आहेस घरी. आणि तिला बायको करून घेतलीस पुन्हा. ती मुकी असली तरी हसायला काय झालं रे तिला? जिला हसायला येत नाही ती अवलक्षणीच मानली पाहिजे.'

राजपुत्रानं प्रथम प्रथम आईच्या असल्या बोलण्याकडं दुर्लक्ष केलं. पण आईनं रोजरोज उठून नवीन नवीन गोष्टी सांगून राजकन्येविषयी त्याचं मन बिघडून टाकलं. राजपुत्र पुरता बिथरून गेला आणि त्यानं राजकन्येला देहान्ताची शिक्षा ठोठावली!


गावाबाहेरच्या माळावर लाकडांची प्रचंड चिता पेटवण्यात आली. राजकन्येला लळलळत्या लाल पिवळ्या ज्वालांनी वेढून टाकले आणि त्याच क्षणी तिच्या मौनाला सात वर्ष पूर्ण झाली.

आभाळात कसलीशी फडफड ऐकू आली. पाठोपाठ बारा कबुतरं जमिनीवर उतरली आणि क्षणार्धात त्यांचं रूपांतर सुंदर बारा राजपुत्रांमध्ये झालं!

बाराही भाऊ झटकन धावले. त्यांनी धगधगती चिता विझवली, आणि आपल्या लाकड्या बहिणीला उचलून बाहेर काढलं. त्यांना पाहून राजकन्येला आकाश आनंदानं ठेंगणं झालं. आपल्या पतीकडं पाहून ती प्रथम हसली आणि ओठ उघडून म्हणाली, 'माझं व्रत आज संपलं. माझे भाऊ मला मिळाले.'

सर्वांनाच आनंद झाला.

सर्व सुखानं राहू लागले.



क्र. ३५४५ २६।४।८८
विषय बा०७१

८

# शेरसिंहाचे चातुर्य

असाच एक राजा होता. जवळपूर प्रदेशात त्याचे राज्य होते. राजा केवळ गादीचा वारस म्हणूनच राजा झालेला होता. एरवी त्याची राजा बनण्याची मुळीच पात्रता नव्हती. तो मूर्खही होता आणि अत्याचारीही होता. लहरी होता, व्यसनीही होता. प्रजेवर तो नाना तऱ्हेचे जबर कर लादायचा आणि जबरदस्तीने, जुलूमाने वसूल करायचा. कर न देणाऱ्याच्या घरादारावरून गाढवाचा नांगर फिरवायचा.

अशा रीतीने राजाच्या अन्यायाने प्रजा पीडलेली होती. छळाला ग्रासलेली होती. पण राजाच्या विरुद्ध बोलणार कोण ? पावसाने झोडले नि राजाने मारले, फिर्याद करायची कोणाकडे ? राजा तसा गंमत्याही होता. एकदा त्याने दवंडी पिटवली की, जो कोणी त्याला मूर्ख बनवील त्याला अर्धे राज्य बक्षीस देण्यात येईल.

दवंडी ऐकून चार-सहाजण पुढे आले, त्यांनी राजाला मूर्ख बनविले, पण राजाने त्यांनाच सुळावर चढविले ! राजाच्या या असल्या तऱ्हेवाईकपणाने प्रजा आणखीनच भयभीत झाली. राजाची दवंडी एकदा शेरसिंहाच्या कानी गेली. शेरसिंह एका खेड्यात राहायचा. त्याला एक बहीण फक्त होती. मोलमजुरी करून शेरसिंह व त्याची बहीण पोट भरायचे. गरीब होते बिचारे !

राजाच्या अत्याचाराने प्रजा गांजलेली पाहून शेरसिंहाला राजाचा

'मला खात्री आहे बाळ, तू ही एक अडाणी, भिकारीण घेऊन आला आहेस घरी. आणि तिला बायको करून घेतलीस पुन्हा. ती मुकी असली तरी हसायला काय झालं रे तिला? जिला हसायला येत नाही ती अवलक्षणीच मानली पाहिजे.'

राजपुत्रानं प्रथम प्रथम आईच्या असल्या बोलण्याकडं दुर्लक्ष केलं. पण आईनं रोजरोज उठून नवीन नवीन गोष्टी सांगून राजकन्येविषयी त्याचं मन बिघडून टाकलं. राजपुत्र पुरता बिथरून गेला आणि त्यानं राजकन्येला देहान्ताची शिक्षा ठोठावली!

गावाबाहेरच्या माळावर लाकडांची प्रचंड चिता पेटवण्यात आली. राजकन्येला लळलळत्या लाल पिवळ्या ज्वालांनी वेढून टाकले आणि त्याच क्षणी तिच्या मौनाला सात वर्ष पूर्ण झाली.

आभाळात कसलीशी फडफड ऐकू आली. पाठोपाठ बारा कबुतरं जमिनीवर उतरली आणि क्षणार्धात त्यांचं रूपांतर सुंदर बारा राजपुत्रांमध्ये झालं!

बाराही भाऊ झटकन धावले. त्यांनी धगधगती चिता विझवली, आणि आपल्या लाकड्या बहिणीला उचलून बाहेर काढलं. त्यांना पाहून राजकन्येला आकाश आनंदानं ठेंगणं झालं. आपल्या पतीकडं पाहून ती प्रथम हसली आणि ओठ उघडून म्हणाली, 'माझं व्रत आज संपलं. माझे भाऊ मला मिळाले.'

सर्वांनाच आनंद झाला.

सर्व सुखानं राहू लागले.



३५४८ २६।४।८८
बा०वा

८

# शेरसिंहाचे चातुर्य

असाच एक राजा होता. जवळपूर प्रदेशात त्याचे राज्य होते. राजा केवळ गादीचा वारस म्हणूनच राजा झालेला होता. एरवी त्याची राजा बनण्याची मुळीच पात्रता नव्हती. तो मूर्खही होता आणि अत्याचारीही होता. लहरी होता, व्यसनीही होता. प्रजेवर तो नाना तऱ्हेचे जबर कर लादायचा आणि जबरदस्तीने, जुलूमाने वसूल करायचा. कर न देणाऱ्याच्या घरादारावरून गाढवाचा नांगर फिरवायचा.

अशा रीतीने राजाच्या अन्यायाने प्रजा पीडलेली होती. छळाला ग्रासलेली होती. पण राजाच्या विरुद्ध बोलणार कोण ? पावसाने झोडले नि राजाने मारले, फिर्याद करायची कोणाकडे ? राजा तसा गंमत्याही होता. एकदा त्याने दवंडी पिटवली की, जो कोणी त्याला मूर्ख बनवील त्याला अर्धे राज्य बक्षीस देण्यात येईल.

दवंडी ऐकून चार-सहाजण पुढे आले, त्यांनी राजाला मूर्ख बनविले, पण राजाने त्यांनाच सुळावर चढविले ! राजाच्या या असल्या तऱ्हेवाईकपणाने प्रजा आणखीनच भयभीत झाली. राजाची दवंडी एकदा शेरसिंहाच्या कानी गेली. शेरसिंह एका खेड्यात राहायचा. त्याला एक बहीण फक्त होती. मोलमजुरी करून शेरसिंह व त्याची बहीण पोट भरायचे. गरीब होते बिचारे !

राजाच्या अत्याचाराने प्रजा गांजलेली पाहून शेरसिंहाला राजाचा

राग येत असे. राजाच्या या छळातून प्रजेची सुटका करावी असे त्याला वाटे. शेरसिंहाने ठरवले, राजाला मूर्ख बनवून राज्य ताब्यात घ्यायचे!

एके दिवशी शेरसिंहाने दाढी मिशा लावल्या, भगवी कफनी घातली आणि राजाकडे गेला, साधू बनून.

राजा त्यावेळी घोड्यावर बसून फेरफटका मारायला निघालेला होता. शेरसिंह राजाच्या घोड्याजवळ गेला आणि राजाला विचारले,

'बेटा, तुझा हा घोडा उडतो का?'

'घोडा उडतो का?' राजाला नवल वाटले.

'हां.'

'महाराज, घोडा वाऱ्यासारखा पळतो हे ठाऊक आहे मला. पण घोडा उडतो हे नाही ठाऊक. घोडा उडू शकतो, महाराज?'

'हां हां, बेटा! तू ऐकलं नाहीस का रावणानं सीता पळविली त्यावेळी तो पक्षीराज घोड्यावरूनच उडत लंकेला घेऊन गेला होता तिला!'

'महाराज, उडणारा घोडा कुठं मिळेल मला?' राजाने विचारले. यावर शेरसिंह म्हणाला,

'लांब जायला नको, शोधायला नको.'

'मग?'

'तुझी इच्छाच असेल तर तुझाच घोडा उडता करून देतो, बेटा!'

'असं?'

'हो.'

'महाराज, कृपा करा आणि माझा हा घोडा उडता करून द्या!'

'जरूर-! बेटा, उतर खाली घोड्यावरून.' राजा खाली उतरला,

शेरसिंह त्याच्या घोड्यावर बसला. म्हणाला, 'मी मंत्र म्हणून घोडा पळवतो नि उंच उडवतो.

तू वर आभाळात पाहात रहा!'

'ठीक आहे' म्हणून राजा आभाळाकडे पाहत राहिला. तेवढ्यात शेरसिंहाने राजाच्या घोड्याला टाच दिली आणि घोडा चौखूर उधळला लांब, लांब पळवला, कुणालाच दिसलाच नाही. राजा मात्र सकाळपासून

संध्याकाळपर्यंत वर तोंड करून 'आभाळाकडे' पाहात राहिला. पण कुठला घोडा नि कुठले काय ?

राजा कंटाळून गेला. मनाशी म्हणाला, 'साधूनं मूर्ख बनवलं आपल्याला !'

राजाला साधूचा राग आला. त्यानं साधूच्या शोधार्थ चारी दिशेला गुप्तहेर धाडले. त्या सर्वांना ताकीद दिली, 'लवकरात लवकर साधूचा पत्ता शोधून काढा !'

गुप्तहेर गेले ठिकठिकाणी फिरले. पाहिले. आठवड्यानंतर साधू नाही. पण घोडा दिसला. हेराने येऊन सांगितले. 'महाराज, एका टेकडीवर आपला घोडा बांधलेला आहे. जवळच शेरसिंह नावाचा शेतकरी राहतो आहे.'

हे ऐकून राजा आणखीनच संतापला.

'चला पाहू या' म्हणून लवाजमा घेऊन टेकडीच्या पायथ्याशी आला.

दुपारची वेळ होती. शेरसिंहाची बहीण अन्न शिजवीत होती. बरेचसे घोडेस्वार टेकडी चढून वर येत आहेत हे तिने पाहिले. तिने लगबगीने शेरसिंहाला बोलावले. शेरसिंहाने राजाच आपल्याला पकडायला येत आहे हे तात्काळ जाणले. काय करावे बरे ? शेरसिंहाने विचार केला.

त्यावेळी चुलीवर हाताची हंडी ठेवलेली होती. शेरसिंहाला युक्ती सुचली. त्याने चूल विझविली आणि शिजलेली भाताची हंडी एका दगडावर ठेवली.

तोवर राजा तिथे पोचलाच. शेरसिंहाला पाहाताच राजाने सेनापतीला हुकूम दिला की, 'या माणसाला अटक करा !'

शेरसिंह हात जोडून म्हणाला, 'महाराज, भात शिजलेला आहे तेवढा खातो नि येतो.'

दगडावर ठेवलेली हंडी पाहून राजाला नवल वाटले ! त्याने विचारले,

'कुठाय भात ?'

'हा काय महाराज, हंडीत.'



'अरे, पण शिजला कसा ? जाळ नाही, विस्तव नाही.'

'महाराज, त्या दगडावर हंडी ठेवली की भात शिजतो.'

'दगडावर भात शिजतो ? खोटं बोलतोस का ?'

'महाराज प्रत्यक्ष पहाच हंडी उघडून.'

राजालाही उत्सुकता वाटली. त्याने सेवकाला हंडीवरचे झाकण काढण्यास सांगितले. झाकण काढले तर खरोखरच हंडीत भात शिजलेला !

राजा आश्चर्यचकित झाला !

त्याने विचारले, 'या दगडावर सगळे काही शिजते ?'

'होय महाराज, सगळे शिजते.'

राजा मूर्ख होता, तसा लोभीही होता.

तो म्हणाला, 'भल्या माणसा, मला हा दगड दे.'

'छे ! छे ! महाराज. हा दगड म्हणजे माझं सर्वस्व आहे. दगडाच्या कृपेनंच मी जगतो आहे. दगड दिला तर माझं कसं होणार ?'

शेरसिंह म्हणाला. राजाने सांगितले, 'तू चिंता करू नकोस. मी या दगडाबद्दल पाच हजार सुवर्ण मोहरा देतो.'

'नको महाराज, नको.'

'बरं दहा हजार देतो.'

राजानं फारच गळ घातली तसा शेरसिंह म्हणाला,

'बरं तर घ्या, महाराज.'

दहा हजार सुवर्ण मोहरा शेरसिंहाला देऊन राजाने तो दगड घेतला.

दुसरे दिवशी राजाने आपल्या इष्टमित्रांना; नगरीतल्या मोठमोठ्या नागरिकांना आपल्याकडे मेजवानीला बोलावले. हेतू हा की, बिनाजाळाचे, विनानिखाऱ्याचे केवळ दगडावर अन्न शिजते हे दाखवावयाचे ! असा अद्भुत दगड आपल्याजवळ आहे, याचा राजाला मोठा अभिमान झाला होता.

राजाच्या निमंत्रानुसार पुष्कळसे लोक जेवायला जमले. राजाने सेवकांकडून दगडावर मोठे थोरले भांडे चढवले होते. राजा त्या दगडाची तारीफ करीत होता. लोक आश्चर्याने ऐकत होते.

पण दोन तास झाले, चार तास झाले, आठ-दहा तास झाले तरी भांड्यातले अन्न तसेच. शिजेचना. लोकांना भूक केव्हाच लागली होती. राजाच्याही पोटात कावळे कोकलत होते. शेवटी रात्र टळून गेली तरी काहीच घडले नाही हे पाहून राजाला संताप आला. शेरसिंहाने आपल्याला परत मूर्ख बनवले, हे त्याने ओळखले.

शेरसिंहाला पकडून आणण्यासाठी परत मोठे सैन्य घेऊन राजा निघाला. शेरसिंहाला याची कल्पना होतीच. राजा सैन्य घेऊन येताना पाहिल्याबरोबर त्याने एक कबूतर मारले आणि त्याचे रक्त एका फुग्यात भरले. तो फुगा बहिणीला कुशीत लपवून ठेवण्यास सांगितले. आणखीही काही सूचना दिल्या आणि स्वतः शेजारच्या खोलीत झोपेचे सोंग घेऊन पडला.

थोडक्याच वेळात राजा टेकडी चढून वर आला. म्हणाला, 'कुठाय लबाड शेरसिंह, मला फसवतो काय.' बहीण म्हणाली, 'तो झोपी गेलाय गाढ !'

'मग उठव त्याला.' राजाने दरडावले.

'छे ! छे ! त्याला झोपेतून उठवलेले खपत नाही. तो संतापाने

चिडतो.'

'पाहू काय करतो ते, चल.' राजाने तिला ढकलतच आत नेले. बहिणीने 'शेरसिंह भैय्या- शेरसिंह भैय्या !' म्हणून हाक मारली. तशी शेरसिंह खवळून उठला. रागाने तिच्यावर गरजला आणि तिच्या कुशीवर कट्याराने वार केला. तशी तो लपवून ठेवलेला फुगा फुटला नि रक्त चोहोकडे सांडले. बहीण प्राण गेल्याप्रमाणे निपचित पडून राहिली.

राजाला हे अघोरी कृत्य पाहून शेरसिंहाचा आणखीनच संताप आला, शेरसिंहाला मारण्यासाठी त्याने तलवार उपसली. पण तेवढ्यात शेरसिंहाने जवळची बासरी घेतली आणि ती तो वाजवू लागला. बासरीचे मंजूळ सूर ऐकताच मृतवत् पडलेली बहीण उठून बसली.

ती जिवंत झालेली पाहताच राजाला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, 'शेरसिंह हा काय चमत्कार आहे.'

'महाराज, हा या बासरीचा चमत्कार आहे.'

'म्हणजे ?'

'महाराज, ही बासरीच तशी आहे. साधी नव्हे. हिच्या सुरात मृत व्यक्तीला जिवंत करण्याचे सामर्थ्य आहे.'

'खरं म्हणतोस ?' राजाने नवलाने विचारले.

'आपण आता पाहिलंच ना, महाराज ?'

'होय रे होय.' राजा म्हणाला. त्याला त्या बासरीचा मोह पडला. राजाने विचारले,

'शेरसिंह, मला तुझी बासरी देतोस ?'

'छे ! छे ! महाराज. माझी ही बासरी प्यारी आहे.'

'शेरसिंह, मी तुला वीस लक्ष सुवर्ण मोहरा देतो, मला बासरी दे !'

राजाने बरीच विनवणी केल्यावर शेरसिंह म्हणाला, 'बरे तर, घ्या !'

वीस लक्ष सुवर्ण मोहरा राजाने शेरसिंहाला दिल्या आणि त्याच्याकडून ती बासरी घेतली. बासरी घेऊन मोठ्या आनंदाने राजा महालात परतला.

प्रधान, सेनापती आणि इतर अधिकाऱ्यांना त्याने काही काही विचारले. राजाला त्यांची उत्तरे पटली नाहीत, तशी त्याने तलवार काढून

त्यांची मुंडकी छाटली.

जिकडे तिकडे हाहाःकार माजला.

राजा म्हणाला, 'घाबरू नका. मी यांना जिवंत करतो.' आणि त्याने बासरी काढून वाजवायला सुरुवात केली. बराच वेळ त्याने बासरी वाजवली पण काही घडले नाही. कुणीच जिवंत झाले नाही.

शेरसिंहाने परत आपल्याला मूर्ख बनवले याचा राजाला संताप, संताप आला.

राजाने सेनापतीला आज्ञा दिली, 'शेरसिंहाला पकडा, एका पेटीत घाला. ती पेटी बंद करून मैदानात ठेवा, तीन दिवस तशीच राहू द्या. चौथ्या दिवशी ती नदीत सोडून द्या !'

सेनापती, शिपाई गेले. त्यांनी शेरसिंहाला पकडले. एका पेटीत बंद केले. पेटी मोकळ्या मैदानात ठेवून निघून गेले.

थोड्या वेळाने पेटीतूनच शेरसिंह म्हणू लागला, 'चला, चला मी स्वर्गाला चाललो आहे. ज्याला यायचे असेल त्याने माझ्याबरोबर चालावे, चला, चला स्वर्गाला चला !'

तिथून एक म्हातारा चालला होता. त्याने हे ऐकले. तो पेटीजवळ गेला. म्हणाला, 'काय म्हणतोस बाबा ?'

शेरसिंहने पेटीतून तेच सांगितले.

म्हातारा थकला भागला होता. त्याला मेल्यानंतरचीच काळजी लागली होती. त्याने आयुष्यभर बरीच पापे केली होती. त्यामुळे मेल्यानंतर स्वर्ग कसा मिळणार, याची त्याला चिंता होतीच.

शेरसिंहाचे हे ऐकून त्याला वाटले, ही संधी बरी आहे. तो म्हणाला, 'तुझ्या आवाजावरून तू तरुण दिसतो आहेस. मग तुझ्याऐवजी मलाच जाऊ दे स्वर्गात. मी तुला माझी संपत्ती, घर, शेती सगळं देऊन टाकतो.'

शेरसिंहाने आधी थोडे आढेवेढे घेतले, पण म्हाताऱ्याचे बरीच विनवणी केल्यानंतर तो कबूल झाला. म्हाताऱ्याने त्याला बाहेर काढले. सगळी संपत्ती आदि दिलं. मग म्हातारा त्याच्या जागी पेटीत बसला. पेटी बंद करून शेरसिंह म्हणाला, 'आजोबा, तिसऱ्या दिवशी देवदूत पेटी

उचलतील तेव्हा काही बोलायचं नाही हं.'

'बरं, बरं नाही बोलणार !'

शेरसिंहाने इकडे म्हाताऱ्याचे घर, शेती ताब्यात घेतली, सुखाने राहू लागला.

तिकडे तिसऱ्या दिवशी राजाच्या शिपायांनी पेटी उचलून नदीत सोडली ती वाहात वाहात गेली. आठ-दहा दिवस झाले आणि एके दिवशी हत्तीवर बसून, दागदागिने व उंची राजवस्त्रे परिधान करून शेरसिंह राजाकडे आला. त्याला पाहताच राजाला नवल वाटले.

शेरसिंहाने सांगितले, महाराज, आपल्या शिपायांनी नदीत पेटी सोडल्यावर नदीच्या राणीने मला आपल्या महालात नेले आणि माझा आदरसत्कार करून संपत्ती दिली ! म्हणाली, 'आणखी कुणाला हवी असेल संपत्ती, वैभव तर माझ्याकडे धाडून दे खुणेची मोहर देऊन !'

हे ऐकून राजाला मोह पडला. त्याने शेरसिंहाला म्हटले, 'मला खुणेची मोहर दे. मी जातो.'

शेरसिंह याला कबूल होईना, तशी राजाने त्याला अर्धे राज्य देण्याची तयारी दाखवली. शेरसिंहाने अर्धराज्य घेतले, मग खुणेची मोहर राजाला दिली. ती घेऊन राजा तीन दिवस बंद पेटीत बसला चौथ्या दिवशी शिपायांनी पेटी नदीत सोडून दिली.

शेरसिंहाच्या मागची कटकट गेली. तो बहिणीसह सुखासमाधानाने राज्य करू लागला. प्रजेवरचे जाचक कर रद्द केले. त्यांच्या हिताच्या सुखाच्या पुष्कळ गोष्टी केल्या. प्रजेचा तो आवडता राजा बनला.

BVBK-0403548